# जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास

## (Jayant Pawar Yanchya Natyakrutincha Abhyas)

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**तेजस्वी श्रीकांत हळर्णकर**

हजेरी क्र. 22P0190010

ABC ID 698930463083

पी. आर 201809275

मार्गदर्शक

**डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा



गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# JAYANT PAWAR YANCHYA NATYAKRUTINCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Tejasvi Shrikant Halarnkar**

Seat No: 22P0190010

ABC ID: 698930463083

PRA: 201809275

Under the supervision of

**Dr. Hemant Aiya**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Hemant B. Aiya and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Halarnkar

(Tejasvi Shrikant Halarnkar)

Seat no: 22P0190010

Date: 16/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the desertation report **"जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास"** is a bonifide work carried out by my Ms. **Tejasvi Shrikant Halarnkar** under my supervision in partial Fulfillment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the discipline Marathi at the Shenoi Goembab School of Languages and Literature, Goa University.

16/04/2024

Dr. Hemant B. Aiya

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY
SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE
TALEIGAON PLATEAU

School stamp

Signature of Dean of the school

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

गोवा विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या एम.ए. मराठी पदवीकरिता प्रबंधिका म्हणून' जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास' (विषय संदर्भ: अधांतर, काय डेंजर वारा सुटलाय आणि माझं घर) हा मी संशोधनासाठी विषय निवडला.

संशोधनाचा प्रवासात मला पहिल्यांदा खुप अडचणी आल्या. संशोधनासाठी विषय निवडताना माझ्या डोक्यात अनेक विषय होते. आधी मी 'लोकसाहित्य' या विषयावर अभ्यास करेन असे ठरवले होते. परंतु त्यावेळी ते काही कारणामुळे शक्य झाले नाही. मी माझ्या मार्गदर्शिका मॅडम पुर्वा वस्त यांच्याकडे गेली तेव्हा त्यांनी मला विषय निवडण्यासाठी खुप मदत केली. तेव्हा मी त्यांच्याशी बोलून शेवटी 'नाटक' या विषयांवर संशोधन करायचे ठरवले व 'जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास' असा विषय संशोधनासाठी निवडला.

इ.स. १९९० नंतरचे महत्त्वाचे लेखक म्हणून जयंत पवार यांना ओळखले जाते. हा विषय निवडण्यामागचे कारण म्हणजे ह्या लेखकावर जास्त कोणी संशोधन केलेले नाही. जयंत पवार हा एक नवा नाटककार आहेत. त्याचबरोबर त्यांनी जी नाटके लिहिली आहे. त्यात त्याने काय मांडले आहे? कशाप्रकारे महानगरीय जाणीवा त्यांच्या लेखनातून दिसून येतात याचा अभ्यास करायचा होता या अनुषंगाने हा विषय निवडला.

माझ्या या शैक्षणिक वाटचालीत मला भेटलेल्या सर्व गुरुजनांचा माझ्या या संशोधनात वाटा आहे. त्यामुळे त्या सगळ्यांची मी ऋणी आहे. माझे सुरुवातीचे मार्गदर्शक पुर्वा वस्त मॅडम यांनी मला विषय निश्चितीपासून आराखडा तयार करण्यासाठी दाखवलेली दिशा आणि त्यानंतर मला संशोधनाच्या पुढील टप्पावर मार्गदर्शन केले. नंतर त्यांनी त्यांच्या अभ्यास रजेच्या काळात मला वेळ देऊन माझ्या अनेक समस्यांचे योग्य ते उपाय सांगितले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. नंतर मला दुसरे मार्गदर्शक म्हणून डॉ. हेमंत अय्या

मिळाले. यामुळे मी माझे काम पूर्ण करू शकले आहे. संशोधनात्मक कार्य करताना शिस्तशीर अभ्यासाची आवश्यकता असते याची जाणीव सरांमुळे झाली.

याचबरोबर मला सतत प्रोत्साहन देणारे डॉ. विनय मडगांवकर सर यांचे देखील मी ऋण व्यक्त करते. तसेच काही विषयासंदर्भात अडचण असल्याने सतत मदत करणारे जयेश गावकर सर आणि चिन्मय घैसास सर यांनी वेळोवेळी मदत केल्यामुळे त्यांचे देखील मी ऋणी आहे. त्याचबरोबर संपूर्ण मराठी विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांचेही आभार मानते.

हे माझे  लेखनकार्य ज्यांच्या सुक्ष्मदर्शी पद्धतीने पार पडले ते माझे मार्गदर्शक डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या यांची मी ऋणी आहे. विविध ग्रंथालयाची गरज मला लाभल्याने त्या सर्व ग्रंथालयातील मंडळींचा मी मनापासून आभार मानते. खास करून आमच्या गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयातील मंडळीचे कारण त्यांनी वेळोवेळी पुस्तके शोधून दिली. ते कधीही न  रागवता मी जी पुस्तके मागितली ती मला आणून दिली. ग्रंथालयाचे कर्मचारी या सर्वांची मदत मोलाची आहे. तसेच माझे मित्र, मैत्रीणी यांची नेहमी साथ असल्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त करते.

सतत माझ्या पाठीमागे असणारे कुटुंबांचे मी ऋण व्यक्त करते. नेहमी मला प्रोत्साहित करणारी, माझी काळजी घेणारी आणि संशोधनाच्या संदर्भात सतत जागृत करणारी माझ्या आईचे मी मनापासून आभार मानते. तसेच मला पुस्तके आणून दिल्याबद्दल माझ्या बहिणींचे देखील आभार मानते .

**तेजस्वी श्रीकांत हळर्णकर**

**Date** 16/04/2024

# जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| | मनोगत | i-ii |
| प्रस्तावना | | **1 - 5** |
| **१** | **मराठी नाटक: स्वरुप विचार आणि घटक** | **6 – 22** |
| **२** | **नव्वदोत्तरी मराठी नाटक आणि जयंत पवार** | **23 – 33** |
| **३** | **जयंत पवारांच्या नाटकातील महानगरीय संवेदना व बदलत्या समाजवास्तावाचे चित्रण** | **34 – 46** |
| **४** | **जयंत पवारांच्या नाटकातील भाषाशैली** | **47 – 54** |
| **५** | **निष्कर्ष** | **55 – 57** |
| परिशिष्ट | | 58 - 76 |
| संदर्भ सूची | | 77 – 79 |

# तक्ता


| | तक्ता | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | नाटकाचे प्रकार | ०९ |
| १.३ | नाटकाचे घटक | १२ |
| २.१ | कथा | २८ |
| २.२ | एकांकिका संग्रह | २८ |
| २.३ | नाटके | २९ |
| २.४ | भाषांतरीत साहित्य | २९ |
| २.५ | वैचारिक | ३० |

# प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, कथा, निबंध आदि वाङ्मयप्रकारांचा समावेश होतो. यातील लोकप्रिय साहित्यप्रकार म्हणून मराठी साहित्यात नाटकाचा उल्लेख केला जातो. नाटक दृकश्राव्य असते. नाटक हा इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळा प्रकार आहे कारण नाटक ही सादरीकरण्याची किंवा दाखवण्याची कला आहे. नाटकात अनेक घटकांचा समावेश होत असतो. त्यातला अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे संवाद होय. संवादाच्या माध्यमातून नाटक हे पुढे जात असते. त्याचप्रमाणे नाटकात कथानक, पात्रचित्रण नेपथ्य असते पण ते सादरीकरण्याचा हेतू मनात ठेवून वेगळ्या पद्धतीने रचले जाते. नाटक रंगभुमीवर सादर केले जाते. नाटकात अभिनयाला महत्व आहे. तसेच नाट्यसंहितेलाही महत्व असते. नाटकाचा जन्म वेद काळात झाला आहे अशी मान्यता आहे. महाभारत, रामायण, पुराणे इ. मधून 'नाटक' या वाङमयप्रकाराचा उल्लेख मिळतो. खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीचा उदय १८४३ मध्ये भावे यांच्या 'सीता स्वयंवर' या नाटकाने झाला. अनेक नाटककारांनी नाटके लिहायला सुरुवात केली. मात्र पूर्वीची नाटके फक्त मनोरंजनाची कार्य करत होती ती कोणत्याही समस्येवर प्रकाश टाकत नव्हती.

मराठी नाट्यसृष्टीचा प्रवाह १९६० नंतर अधिक विस्तृत होत गेला. या कालखंडात वाङमयामध्ये परिवर्तन घडून आले आणि नाटक व रंगभूमीवरही याचे पडसाद उमटले. याविषयी डॉ. सुषमा जोगळेकर म्हणतात, "१९६० नंतरचा काळ हा मराठी नाटकाच्या दृष्टीने विशेष लक्षवेधी काळ होता. विसाव्या शतकाच्या पूर्वर्धात विविध ज्ञानक्षेत्रांत घडणाऱ्या घडामोडींमुळे माणसाच्या जगाविषयीच्या आकलनामध्ये देखील झपाट्याने बदल घडून येत होता. या बदललेल्या आकलनाचे प्रतिबिंब साहित्यात पडणे अपरिहार्य होते".१९९० नंतरच्या कालखंडात अनेक नाटककारांनी नाटके लिहिली. सतीश आळेकर, चं. प्र. देशपांडे, शाम मनोहर, प्रेमानंद गज्वी, मकरंद साठे, दीपक करंजीकर, संतोष पवार, केदार जाधव, मनस्विनी लता, दत्ता पाटील, हिमांशु स्मार्त इत्यादी, त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचे नाटककार म्हणजे जयंत पवार होय.

१९९० नंतरचे एक अत्यंत महत्त्वाचे लेखक म्हणजे जयंत पवार यांचा उल्लेख केला पाहिजे. यांना आघाडीचे नाटककार असे म्हटले जाते. त्यांनी अनेक क्षेत्रात काम केले आहे. जयंत पवार यांची नाट्यकृती

वैशिष्ट्यपूर्ण आहे तसेच आधुनिक जाणीवा व्यक्त करणारी आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण नाट्यकृतींचा अभ्यास या विषयातून करणार आहे.  जयंत पवार हा नाटककार तसेच कथाकार, पत्रकार देखील होता. जयंत पवार हे १९९० नंतर उदयाला आलेले एक महत्वाचे लेखक आहे म्हणजे १९९० नंतर एकूण मराठी साहित्यात त्यांनी वैविद्ध विषयांवर लेखन केले आहे. जयंत पवार यांचा जन्म मुंबईमध्ये झाला. त्यात परळीच्या गिरणी कामगारांच्या चाळीत ते लहानाचे मोठे झाले. त्यांनी काही काळ गिरणीमध्ये कामही केले त्यामुळे त्यांनी जे वास्तव जवळुन पाहिले अनुभवले ते त्यांनी आपल्या साहित्यात मांडलेले दिसून येते.

१९६० नंतर नाट्यक्षेत्रात अनेक बदल झाले. विविध नवीन विषयांवर लेखन करायला सुरुवात झाली. त्यानंतर नवदोतरी कालखंडात परंपरा बदलत गेली. जागतिकीकरणामुळे आज शहरांमध्ये कसे बदल घडले आहेत. माणसांची वृती बदलली, जगण्याची शैली बदलली, संस्कृतीत बदल झाला तसेच स्त्रियांच्या झालेल्या श्रमाच्या पितळ उघड करणे, गिरण कामगारांचे दुःख, महानगरातील लोकांची स्थिती त्यांच्या एकुण जगण्याचे वास्तव त्याचप्रमाणे या कालखंडातील भिन्न जाणीवा आणि अनेक प्रश्नांवर प्रकाश जयंत पवार यांनी टाकलेला आहे. नव्वदोत्तरी नाट्यपरंपरा मराठीमध्ये कशी वृध्दीगत  होत गेली आणि जयंत पवार या लेखकाने नाट्यक्षेत्रामध्ये नवीन क्काय वेगळं दिलेले आहे हे समजून घ्यायचे आहे. त्याचप्रमाणे या कालखंडातील एका श्रेष्ठ नाटककाराचा नाट्यकृतीचा अभ्यास या शोधप्रबंधातून होणार आहे. तसेच आशयदृष्टा आज जयंत पवार यांची नाटक कसे आहे आणि त्यांनी नाटक संहिता लेखन करत असताना नाट्यलेखनात काही वेगळे प्रयोग केले आहे का? हे ही जाणून घेण्याचा प्रयत्न होय.

**संशोधन विषयक समस्या**

नवदोत्तरी कालखंडातील अत्यंत महत्त्वाचे लेखक म्हणजे जयंत पवार. त्यांनी त्यांच्या लेखनामधून अनेक विषय मांडले आहे. तसेच भिन्न जाणीवा व्यक्त केली आहे. एकंदर महानगरातील बदलते समाज वास्तव, महानगरीय माणसांचे जगणे, वागणे, ताणतणाव, संघर्ष, स्वार्थ, गिरण कामगार, शोषितांचे वर्ग चित्रण याचा वेध घेतला जातो. जागतीकिकरणाचा मराठी रंगभूमीवर काय परिणाम झाला? या परिणामांचे स्वरूप काय ? नाटकाच्या माध्यमातून तो परिणाम कसा व्यक्त झाला ? याचा शोध घेणे महत्वाचे ठरते. तसेच त्या

परिणामाकडे नाटककार कसा बघतो ? तो ते कसे आपल्या लेखनांतून मांडतो? याचा वेध घेणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे त्यांच्या नाटकातून येणाऱ्या पात्रांचा विचार करणे इथे गरजेचे ठरते. जयंत पवारांच्या नाट्यलेखन तंत्राची वैशिष्ट्यपूर्णता जाणवते आणि त्यांचे नाटक वेगळे कसे आहे हे समजून घेणे महत्त्वाचे असल्याकारणाने जयंत पवारांच्या नाट्यकृतीचा अभ्यास या विषयाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

**उद्दिष्टे**

१. नाटक हा साहित्यप्रकार समजून घेणे.
२. १९९० नंतरचे मराठी नाटक समजून घेणे.
३. जयंत पवारांच्या नाटकात येणाऱ्या महानगरीय संवेदना व बदलता समाजवास्तवाचा वेद घेणे.
४. जयंत पवार यांच्या नाटकातील पात्रांचा अभ्यास करणे.
५. जयंत पवारांचा नाटकातून येणाऱ्या भाषेचा अभ्यास करणे.

**गृहितकांची मांडणी (formulation of hypothesis)**

१. १९९० नंतरच्या नाटकामध्ये विषय वैविध्य दिसून येते.
२. जयंत पवारांच्या नाटकात महानगरीय संवेदना तसेच बदलता समाजवास्तवांचा वेध घेतलेला दिसून येतो.
३. जयंत पवारांच्या नाटकात मध्यमवर्गीय, गरीब, कष्टाने जीवन जगणारी अशी पात्र त्यांच्या नाटकामध्ये दिसून येतात.
४. जयंत पवारांच्या नाटकामध्ये त्यांनी हिंदी, इंग्रजी मिश्रित भाषा वापरलेली दिसून येते.

**संशोधन पद्धती**

'जयंत पवार यांच्या नाट्यकृतीचा अभ्यास ' करीत असताना वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच नाटक हा साहित्यप्रकार अभ्यास करताना ऐतिहासिक पद्धतीचा वापर होईल. त्याचप्रमाणे तौलनिक संशोधनपद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

**अ. वर्णनात्मक पद्धती**

जयंत पवारांचा नाटकातील आशय समजून घेण्यासाठी आणि भिन्न जाणीवा समजून घेण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल.

**ब. ऐतिहासिक पद्धती**

नाटक हा साहित्यप्रकार समजून घेण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होईल. त्याचप्रमणे नाटकाचे एकंदरीत घटक, स्वरूप, संकल्पना इत्यादींचा अभ्यास करताना या पद्धतीचा वापर केला जाईल.

**क. तौलनिक पद्धती**

जयंत पवारांनी १९९० नंतर बदलत गेलेले नाटकाचे स्वरूप कश्याप्रकारे त्यांनी त्यांचा नाटकात मांडले आहे याचा शोध या पद्धतीव्दारे करण्यात येईल.

**प्रबंधिकेची मांडणी**

**प्रकरण १ मराठी नाटक : स्वरुप विचार आणि घटक**

**प्रकरण २ नव्वदोत्तरी मराठी नाटक आणि जयंत पवार**

**प्रकरण ३ जयंत पवारांच्या नाटकातील महानगरीय संवेदना व बदलत्या समाजवास्तावाचे चित्रण**

**प्रकरण ४ जयंत पवारांच्या नाटकातील भाषाशैली**

**प्रकरण ५ निष्कर्ष**

**समारोप**

'जयंत पवार यांच्या नाट्यकृतीचा अभ्यास' या विषयाअंतर्गत त्यांची तीन नाटके निवडली आहे. या प्रबंधाचा अभ्यास व शोध घेण्यासाठी एकूण पाच प्रकरणांची रचना करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणातून नाटक हा साहित्यप्रकाराचा स्वरूप व संकल्पना यांचा आढावा घेण्यात आला आहे. दुसऱ्या प्रकरणात १९९० नंतरचे मराठी नाटक कसे वेगळे आहे याचा शोध घेतला जाणार आहे. तिसऱ्या प्रकरणात नाटकातून महानगरीय

संवेदना व बदलत्या समाजवास्तवाचा शोध घेतला जाणार. चौथ्या प्रकरणातून जयंत पवार यांच्या नाटकातील भाषेचा अभ्यास  करण्यात आला आहे. पाचव्या प्रकरणातून निष्कर्ष मांडला आहे.

# प्रकरण १

# मराठी नाटक: स्वरुप विचार आणि घटक

**प्रास्ताविक......7**

**१.१ मराठी नाटकाची वाटचाल......8**

१.१.१ किर्लोस्करपूर्व मराठी नाटक......9

१.१.२ आधुनिक मराठी नाटक......10

१.१.३ अत्रे कालीन मराठी नाटक......11

१.१.४ साठोत्तरी मराठी नाटक......11

**१.२ 'नाटक' संकल्पना व स्वरूप......12**

**१.३ नाटकाचे घटक......16**

१.३.१ कथानक......17

१.३.२ पात्रनिर्मिती......18

१.३.३ संवादयोजना......18

१.३.४ घटना- प्रसंग......19

१.३.५ संघर्ष......19

१.३.६ शीर्षक......19

१.३.७ भाषा......19

**१.४ समारोप......20**

**१.५ निष्कर्ष......20**

**संदर्भ......21**

## प्रकरण १

# मराठी नाटक: स्वरुप विचार आणि घटक

## प्रास्ताविक

मानवी जीवनात अनेक गोष्टी घडतात. काही गोष्टी सुख देणाऱ्या असतात तर काही दुःख देणाऱ्या असतात. आयुष्य म्हटले की सुख आणि दुःख हे दोन्ही परस्पर येतात. त्याकरिता त्यातून बाहेर पडण्यासाठी मानवाने आपल्या मनोरंजनासाठी, आनंदासाठी ललित साहित्य निर्माण केले आहे. कविता, कादंबरी, कथा, यांचे वाचन करून मानव एकप्रकारे आपल्या जीवनाचा आनंद घेतो. त्याचप्रमाणे कलात्मक साहित्याचे अधिक विशेष स्थान मानवाच्या जीवनात आहे. माणसाने आपल्या मनोरंजनासाठी साहित्याची निर्मिती केली. भजन, कीर्तन, भारुड अशा अनेक प्रकारांची निर्मिती समाजाने आपल्या मनोरंजनाच्या गरजा भागविण्यासाठी निर्माण केल्या. केवळ मनोरंजनच नव्हे तर मनोरंजनाबरोबरच प्रबोधन करण्यासाठी नाटकाचा उपयोग होऊ लागला. 'नाटक' हा दृकश्राव्य साहित्यप्रकार आहे; त्यामुळे त्याला मराठी साहित्यात एक वेगळेपण प्राप्त झालेले आहे. नाटकामध्ये नेपथ्य, अभिनय, काव्य, चित्रकला, नृत्य अशा अनेक ललितकलांचा समावेश होतो. 'नाटक' हा इतर साहित्यप्रकारांपेक्षा एक वेगळा प्रकार म्हणून संबोधला जातो कारण कथा, कादंबरी हे वाङ्मयप्रकार वाचकनिष्ट आहेत. 'नाटक' हा दृकश्राव्य साहित्यप्रकार असल्याने आपण डोळयांनी पाहू शकतो व कानांनी ऐकू शकतो म्हणून 'नाटक' हा मिश्र कला प्रकार आहे. कथा, कादंबरी इत्यादी वाङ्मयप्रकार आपण फक्त वाचू शकतो, परंतु 'नाटक' हे प्रत्यक्ष वाचता येते तसेच रंगमंचावर पाहता, ऐकता व अनुभवता येते. नाटकात अनेक गोष्टींना महत्त्व असते. नेपथ्य, रंगमंच, प्रकाश, संगीत, अभिनय यांच्या मदतीने नाटक साकार होत असते. प्रेक्षक हा नाटकाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. कारण प्रेक्षक नसेल तर नाटकाचा आस्वाद कोण घेणार? किंवा प्रेक्षक नसतील तर नाटक कधीच सफल होत नाही. मराठी साहित्यातील 'नाटक' हा लोकप्रिय साहित्यप्रकार म्हणून उल्लेख केला जातो.

प्रस्तुत प्रकरणात 'नाटक' या वाङ्मयप्रकाराचे सैद्धांतिक आकलन करून त्याद्वारे आवश्यक नाट्यघटकांचा उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'नाटक' म्हणजे काय? समीक्षकांनी नाटकांविषयी केलेल्या व्याख्या, मराठी नाटकाचा उगम, आदि. मराठी नाटकाशी संबंधित सैद्धांतिक बाबींची उकलताने उपअनुच्छेदांद्वारे केलेली आहे.

**१.१ मराठी नाटकाची वाटचाल**

अव्वल इंग्रजी काळात मराठी नाटकाची सुरुवात संगीत नाटकापासून झाली आहे. १८४३ साली विष्णुदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर' या नाटकापासून मराठी नाटकाचा प्रारंभ झाला असे मानले जाते. 'सीतास्वयंवर' या नाटकाला मराठीतील पहिले 'नाटक' असे मानले जाते.[1] 'विष्णुदास भावे' यांनी १८४२ साली 'सीतास्वयंवर' हे 'नाटक' लिहिले आणि १८४३ साली ते रंगभूमीवर सादर झाले. मराठी नाटकाची सुरुवात 'सीतास्वयंवर' या नाटकापासून झाली असे जरी म्हटले तरी मराठी नाटकाचा उगमाचा विचार करत असताना तंजावरच्या नाटकांचा विचार करणे गरजेचे आहे. कारण असे म्हणण्यात येते की तंजावरमध्ये अनेक नाटके निर्माण झाली मात्र त्यांचा महाराष्ट्राशी संबंध नसल्याने त्या नाटकांचा विकास झाला नाही. तंजावर हा तामिळनाडू प्रदेशातील एक भाग आहे. विष्णुदास भावेंच्या आधी ही मराठी भाषेत नाटके लिहिली जात होती. तंजावरील व्यंकोजी राजे भोसले यांच्या घराण्यातील व्यक्तींनी नाटकाचे लेखन केलेले आहे. अशी माहिती **'डॉ.चंद्रशेखर कणसे'** यांनी **स्वातंत्र्योत्तर काळात मराठी रंगभूमीवर पाश्चात्य रंगभूमीचा झालेला प्रभाव** या पुस्तकात मांडलेली आहे.

वि. का. राजवाडे यांनी 'नाट्यकलेची परंपरा जुनी असून तिचे मूळ तमाशे, ललिते, भारुडे इत्यादींमध्ये सापडते.'[2] असे सांगितलेले आहे व नाटकाची परंपरा ही सहाशे वर्षे जुनी असल्याचे विवेचन केले आहे. विष्णुदास भावे यांना नाटकाचा 'जनक' असे म्हटले जाते. त्यांची नाटके पौराणिक स्वरूपाची होती. विष्णुदास भावेंनी १८४३ साली 'सीतास्वयंवर' या नाटकाचा प्रयोग सांगलीमध्ये केला. १८४३ ते १८८० या कालखंडात भाषांतरित नाटके म्हणजेच इंग्रजी व संस्कृत नाटके रंगभूमीवर आली. त्यानंतर

कालिदासाने 'शाकुंतल' हे मराठी नाटक लिहिले. पौराणिक नाटकांबरोबर ऐतिहासिक नाटक देखील आले. 'थोरले माधवराव पेशवे' हे पहिले मराठीतील ऐतिहासिक 'नाटक' म्हणून ओळखले जाते.

१९२० नंतरच्या काळात रंगभूमीच्या स्वरूपात तोचतोचपणा आलेला पाहायला मिळतो. त्यामुळे बहुतेक नाटके त्या काळातील चालणारी नव्हती. काही ठराविक 'संगीत सौभद्र', 'संगीत सीतास्वयंवर','संगीत. संशयकल्लोळ' इत्यादी नाटकांवरच रंगभूमी जगत होती. रांगणेकरांनी नाटके लिहिली त्यांचा काळ नाटक- रंगभूमीच्या अवनतीचा असे म्हणण्यात येते.[3]

वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, बाळ कोल्हटकर, वि. वा. शिरवाडकर, रत्नाकर मतकरी, जयवंत दळवी, श्री.ना.पेंडसे, महेश एलकुंचवार इत्यादी नाटककारांनी मराठी नाट्यसृष्टीत १९५० नंतरच्या कालखंडात मोठे योगदान दिले आहे. त्यादरम्यान सामाजिक, कौटुंबिक, प्रायोगिक असे अनेक प्रवाह आले.

### १.१.१ किर्लोस्करपूर्व मराठी नाटक

सतराव्या शतकापासून भोसलेराजांनी तंजावरला मराठी नाटक निर्माण केलेले होते; पण त्यांचा संबंध महाराष्ट्राशी नव्हता. मराठी समाजाला मात्र लोकरंगभूमी परिचित असल्याने विष्णुदास भावे यांनी १८४३ साली सांगली येथे 'सीतास्वयंवर' या नाटकाचा प्रयोगाने आपल्या नाटयकार्याला सुरुवात केली. 'सीतास्वयंवर' नाटक घडण्यामागचे कारण म्हणजे १८४२ साली कर्नाटकातील 'भागवतमेळा' नावाचा नाट्यसंघ सांगलीमध्ये यक्षगानाचा खेळ सादर करण्यासाठी आला होता. तेव्हा त्यांचा खेळ राजे पटवर्धनांनी पाहिला व त्यांनी त्यांची इच्छा व्यक्त केली की मराठीमध्येही असेच काही आपण केले पाहिजे. विष्णुदासांनी तो खेळ पाहिला. नुकताच यक्षगानाचा खेळ पाहून त्यांनी 'सीतास्वयंवर' हे नाटक मनोरंजन म्हणून लोकांसमोर रंगमंचावर सादर केले.

विष्णुदास भावेंची नाटके मुखतः पौराणिक स्वरूपाची होती. १८४३-१८८० या कालखंडात संस्कृत व इंग्रजी नाटकांची भाषांतरीत नाटके रंगभूमीवर आली. १८६० नंतर अधिक बुकीश नाटके आली. या काळात'फार्स' हा एक नवीन प्रकार मराठी नाटकात आला. 'नारायण राव पेशवे यांचा मृत्यू' हे पहिले मराठीतील फार्स आहे.

इंग्रजी नाटकापेक्षा मराठी नाटकांवर संस्कृत नाटकांचा परिणाम जास्त दिसून येतो. थोड्या प्रमाणात फार्सचा देखील परिणाम झालेला आहे. नंतर सामाजिक स्वरूपाची नाटके निर्माण होऊ लागली. त्यात महादेव चितळे यांचे 'मनोरमा' हे पहिले मराठीतील सामाजिक नाटक आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी शाकुंतल, संगीत सौभद्र यासारखी नाटके लिहून नाट्य परंपरेला एक विशिष्ट स्थान प्राप्त करून दिले. १८५५ मध्ये महात्मा फुले यांनी 'तृतीय रत्न' नाटक लिहिले. हे खऱ्या अर्थाने मराठीतील पहिले लिखित स्वरूपाचे नाटक आहे.

### १.१.२ आधुनिक मराठी नाटक

मराठी नाटक विकास व्यवस्थेकडे १८८० ते १९२० या कालखंडात जाऊ लागले. कोल्हटकर, देवल, खाडिलकर, राम गणेश गडकरी इत्यादी नाटककार या कालखंडात निर्माण झाले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १२ नाटके लिहिली. कोल्हटकरांचा नाट्यलेखनाचा काळ १९०१ ते १९१० हा दशक प्रामुख्याने ओळखला जातो. कोल्हटकर यांनी पौराणिक, ऐतिहासिक विषयांवर नाट्यलेखन केले नाही, तर स्वतंत्र, कल्पनारम्य स्वरूपाची नाटके लिहिलेली दिसून येतात. 'वीरतनय' (१८९६), 'मतिविकार' (१९०६), 'मूकनायक' (१९०१) इत्यादी नाटके त्यांनी रंभूमीवर आणली. कोल्हटकर या काळात किर्लोस्कर मंडळीचे नाटककार होते.

खाडिलकर यांनी पंधरा नाटके लिहिली. त्यांनी एकच दृष्टिकोन ठेवला नाही. केवळ नाटकातून विचार प्रबोधन व्हावे म्हणून नाटक लिहिले नाही तर त्या बरोबर मनोरंजन देखील व्हावे अशी युक्ती ठेऊन नाटके लिहिली. त्यांचे 'कीचकवध' हे नाटक खूप गाजले.

किर्लोस्करानंतर देवल यांनी मराठी रंगभूमीवर दर्जेदार नाटके लिहिली. १८८५ साली किर्लोस्कर गेल्यानंतर देवलांची नाटके रंभूमीवर आली. त्यांनी आपली स्वतंत्र अशी सृजनशीलतेने नाट्यलेखन शैली वापरून लेखन केलेले आहे. त्यांनी एकूण सात नाटके लिहिली. त्यांनी संस्कृत नाटकांची भाषांतरे केली त्याचसोबत इंग्रजी भाषेतील नाटके मराठीमध्ये आणली.

राम गणेश गडकरी यांनी या कालखंडात मराठी रंगभूमी भारुन टाकली. गडकरी कोल्हटकरांना गुरू मानायचे. गडकरींनी 'एकच प्याला', 'पुण्यप्रभाव', 'प्रेमसंन्यास', आदि नाट्य लेखन केले. त्यांनी स्त्रियांच्या भावभावनांचा मागोवा घेतलेला दिसतो. त्याग, पातिव्रत्य, निष्ठा आदिने स्त्रियांच्या आयुष्याची झालेली वाताहत दाखवून दिली आहे. त्यांच्या नाटकातून दुर्दैवी स्त्रिया दिसून येतात. उदाहरणार्थ 'प्रेमसंन्यास' या नाटकात मनोरमा, लीला या दुर्दैवी स्त्रिया नाटकात दिसतात.

### १.१.३ अत्रे कालीन मराठी नाटक

१९२० नंतर मराठी नाटकात बहुविविधता आली. या कालखंडात अनेक नाटककारांनी नाटके लिहिली. आशय आणि तंत्रदृष्टीने हा कालखंड दर्जेदार बनला. १९२० नंतर मराठी रंगभूमीवर प्रल्हाद केशव अत्रे, मामा वरेरकर, रांगणेकर, दामोदर सावरकर इत्यादी नाटककारांनी या काळात नाट्यलेखन केले. अत्रे यांनी 'साष्टांग नमस्कार', 'लग्नाची बेडी' अशा नाटकातून नवचैतन्य रंगभूमीमध्ये आणले. हा कालखंड लोकरंजनाकडे जास्त वळलेला दिसून येतो. त्यामुळे या कालखंडात जास्त प्रमाणात मनोरंजन करणारी नाटके निर्माण झाली आहे. मामा वरेरकरांनी मराठी रंगभूमी जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. त्यांनी अनेक नाटके लिहिली. कोणतीही समस्या निर्माण झाली की त्यांच्यावर ते नाट्यलेखन करायचे. 'कुंजविहारी', 'हाच मुलाचा बाप', 'द्वारकेचा राजा' सारखी नाटके त्यांनी लिहिली. वरेरकर यांनी सनातन हिंदू समाजातील रुढी-परंपरा, त्यांचा नशिबी आलेले दुःख आदि तत्कालीन प्रश्नांना हात घातलेला दिसतो. त्यांचा नाटकात स्त्रियांना महत्त्व असल्याचे दिसून येते.

### १.१.४ साठोत्तरी मराठी नाटक

साठोत्तरी कालखंडात अनेक नवीन नाटककार उदयाला आले. त्यांनी विविध विषयांवर नाटके लिहिली. या कालखंडातील काही महत्त्वाचे नाटककार म्हणजे सतीश आळेकर, महेश एलकुंचवार, चि. त्र्यं खानोलकर, श्याम मनोहर, चं. प्रं. देशपांडे आदिनी महत्त्वाची नाटके लिहिली. समकालीन वास्तवाचा एक वेगळा विचार तेंडुलकरांनी त्यांच्या नाटकांतून मांडलेला दिसून येतो. सतीश आळेकर यांनी 'महानिर्वाण' सारख्या नाटकातून पारंपरिक आकृतीतून नवा आशय मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १९६० नंतरच्या

काळात आळेकरांची ‘महानिर्वाण’ आणि ‘दुसरे बेगम बर्वे’ ही दोन नाटके अत्यंत गाजली. ‘महानिर्वाण’ नाटकामध्ये नृत्य – संगीत आहे आणि त्याची रचना कीर्तनातून केली आहे. आळेकरांनी नाटकात काळतत्वाचा वापर केलेला दिसतो. त्याचप्रमाणे चं. प्रं. देशपांडेनी नाटकातून माणसामाणसातील नात्यात होत गेलेल्या दुरावाचा वेध घेतलेला आहे. विजय तेंडूलकर, वसंत कानेटकर, वि. वा. शिरवाडकर अशा नाटककारांनी नवीन संहिता देऊन मराठी रंगभूमीच्या प्रयोगाला जीवित ठेवण्याचे काम केले.

१९६० नंतर प्रायोगिक रंगभूमी अस्तित्वात आली. या काळात ‘प्रायोगिक नाटक’ या संज्ञाचा वापर होऊ लागला. या कालखंडात अनेक नवीन विषय रंगभूमीवर किंवा नाटकांमध्ये यायला सुरुवात झाली. १९६० नंतर मराठी नाट्यसृष्टीचा प्रवाह विस्तारत गेला. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी नाट्यसृष्टीत खूप बदल झालेले दिसून येतात. आधुनिक कालखंडात ‘प्रायोगिक नाटक’ हा महत्त्वाचा प्रवाह उदयाला आला. महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, विजय तेंडुलकर, चि. त्र्यं. खानोलकर, रत्नाकर मतकरी, अच्युत वझे यांनी नाट्याची निर्मिती केली. या काळात पारंपरिक चौकट मोडून एक आगळावेगळा विषय नाटकातून आलेला दिसतो. १९७० पासून मराठी रंगभूमीवर नव्या जाणीवा येऊ लागलेल्या दिसून येतात.

**१.२ ‘नाटक’ संकल्पना व स्वरूप**

निबंध, कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र- आत्मचरित्र, प्रवासवर्णन अशा अनेक प्रकारांमध्ये साहित्याची विभागणी केले जाते. त्यापैकी ‘नाटक’ हा साहित्यप्रकार दृकश्राव्य स्वरूपाचा असल्याने या वाङ्मयप्रकारचे एक विशेष वेगळेपण आहे. “‘नाटक’ या वाङ्मयप्रकाराला समाजजीवनाचा आरसा म्हटले जाते”[4]. समाजातील लोकांचे प्रश्न, समस्या, त्यांची भावना, समाजातील माणसांचा स्वभाव तसेच समाजात घडणाऱ्या अनेक घटना या सर्वांचे दर्शन नाटकातून चित्रित केले जाते. त्यामुळे नाटकाला समाजाचे अनुरूप दर्शन घडवणारा साहित्यप्रकार असे म्हटले जाते. ‘नाटक’ हा एक प्रवाह आहे जो एकप्रकारे वर्तमानाकडून भविष्याकडे वाहत असतो. या साहित्यप्रकारात कथनकार हा अदृश्य असतो व नाटकाचे कथानक घटना आणि पात्रांच्याद्वारे दाखवले जाते.

### १.२.१ नाटक : दृकश्राव्य कला


'नाटक' हा साहित्यप्रकार इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळा मानला जातो. कारण 'नाटक' ही दाखवण्याची किंवा सादरीकरणाची कला आहे. संस्कृत वाङमयप्रकारात नाटकाला महान नाट्य परंपरा होती. 'नाटक' हा रंगभूमीशी निगडित असलेला एक वाङ्मयप्रकार आहे. नट, दिग्दर्शक, नाटककार आणि प्रेक्षक यांच्या साहाय्याने नाटक सिद्ध होते. नाटकात समाजाचे चित्रण आजूबाजूल्या घडणाऱ्या घटना, तसेच एकूण जीवनाचे चित्रण लेखक चित्रित करत असतो. नाटकात 'संहिता' ही फार महत्वाची असते. संहितेला नाटकाचे प्राणतत्व मानले जाते.[5] नाटकाची संहिता जेवढी दर्जेदार, श्रेष्ठ असेल तेवढेच नाटकाला यश प्राप्त होते. नाटकाचा उल्लेख रामायण – महाभारतात देखील आहे.

**'वादयन्ति तदा शान्ति लासयन्त्यपि चाप रे |**
**नाटकान्यपरे स्माहुर्शस्यानि विविधानि च ||'**[6]

जेव्हा भरत अयोध्येला परत आला तेव्हा मार्कंडेय ऋषींनी राज्यात अराजक माजले होते हे सांगताना नाटकांचा उल्लेख केला आहे. यावरून नाटक हे प्राचीन काळापासून म्हणजेच रामायण काळात व त्यापूर्वीही भारतात प्रचलित होते हे इथे स्पष्ट होते. गोव्यात दशावताराचे नाट्य खूप प्रचलित आहे. दशावताराची परंपरा ही प्राचीन आहे. प्राचीन काळात नाट्य प्रचलित होते याचे पुरावे प्राचीन मराठी वाङ्मयात आहेत.[7] या ग्रंथाच्या प्रस्तावनेत रा. चि. ढेरे यांनी सोंगे आणि खेळ या संबंधीचे प्राचीन मराठी वाङ्मयात उल्लेख नोंदवले आहे.

'नाटक' हा शब्द 'SPAW' आणि 'SPAUA' या ग्रीक शब्दापासून आलेला आहे. नाटकाला इंग्रजीत DRAMA असे म्हटले जाते. Dran या मूळ ग्रीक शब्दावरून 'drama' हा शब्द रुढ झाला. 'Dran' या शब्दाचा अर्थ कृत्ती करणे आहे. इंग्रजीत नाटकाला 'प्ले' किंवा 'गेम' असे शब्द विल्यम शेक्सपियरच्या काळापर्यंत प्रचलित होती.[8] संस्कृतमधील 'नट' या धातूपासून 'नाट्य' ह्या शब्दांची व्युत्पत्ती झाली आहे. 'नट' याचा अर्थ नाचणे किंवा अभिनय करणे असा आहे. ''नाट्यं भावानुकीर्तनम्'' अशी भरतमुनीने नाटकाची व्याख्या केली आहे. [9]

भरतमुनीनी '**नाट्यशास्त्र**' गा ग्रंथात नाटकाविषयी लेखन केलेले आहेत. हा ग्रंथ या विषयावरील अत्यंत महत्वाचा आहे. भरतमूनींना भारतीय संस्कृतीत जो मान आहे तोच मान ॲरिस्टॉटला ग्रीक संस्कृतीत आहे. ॲरिस्टॉटल ने 'पोएटिक्स' नावाचा ग्रंथ लिहिला त्यात त्याने नाटकाच्या स्वरूपाविषयी चर्चा केली आहे. ग्रीक अभ्यासक ॲरिस्टॉटल यांनी नाटकाचे दोन प्रकार सांगितले आहे.




**तक्ता क्र १.१ नाटकाचे प्रकार**

'सुखात्मिका' याला सुखांतिका असेही म्हटले जाते. सुखात्मिका म्हणजे ज्याचा शेवट चांगला म्हणजेच आनंनदायी होतो. शोकात्मिकेमध्ये माणसाच्या दु:खाचे चित्रण असते. सुखात्मिकेची चर्चा **प्लेटो** या पश्चिमात्य अभ्यासकाने "It is necessary to consider and recognise ugly thoughts and persons and those which are intended to produce laughter in comedy. For serious things cannot be understood without laughable things. And for this very reason he should learn them both, in order that he may not in ignorance do or say anything which is ridiculous and out of place."[10] अशी व्याख्या केली आहे.

### १.२.२ नाटकाची व्याख्या

१. "नाटक' हे जीवनाचे अनुकरण आहे, चालीरीतींचा आरसा आहे; सत्याचे प्रतिबिंब आहे"[11]

**– सिसरो**

२. “नाटक हे निसर्गाचे अनुकरण नसून त्याची नक्कल आहे”[12]

– **कॉलरिज**

वरील दोन्ही व्याख्या वाचून असे लक्ष्यात येते की अभ्यासक सिसिरो म्हणतो की ‘नाटक’ म्हणजे जीवनाचे अनुकरण आहे पण कॉलरीजच्या मते ‘नाटक’ हे अनुकरण नसून नक्कल आहे यावरून कॉलरीज सिसीरो यांच्या मताशी सहमत नाही हे कळते.

३. “नाटक हे आपल्याला कमीपणा आणणाऱ्या व बंधन घालणाऱ्या दैवी शक्ती व निसर्ग यांच्या संघर्षात सापडलेल्या माणसाच्या इच्छेने प्रतिनिधित्व करते”[13]

– **विल्यम अर्चर**

४. **वसंत कानेटकरांनी** नाटकाविषयी सांगताना “नाटक म्हणजे एक प्रकारचा भातुकलीचाच खेळ आहे. पण चतुर कलाकारांनी कल्पकतेने मांडलेला एक जिवंत चैतन्यशील खेळ आहे. खेळात तेवढ्याच चातुर्याने सहभागी होणाऱ्या कल्पक प्रेक्षकांसाठी.” [14] असे सांगितले आहे.

५. “रंगभूमीवर नटाकडून अभिनयाच्या व भाषणाच्या द्वारे लोकसमुदायास सांगितलेली कथा म्हणजे नाटक.” [15] अशी नाटकाची व्याख्या **ना. सी. फडके** यांनी सांगितली आहे.

६. “निसर्गाच्या गूढ शक्ती, अटळ प्रारब्ध, सामाजिक नियम, आपला द्वेष करणाऱ्या व्यक्ती किंवा अखेर आपला स्वतःचाच आत्मा यांच्याशी मनुष्याचा जो झगडा चाललेला असतो त्याचे प्रतिदर्शन म्हणजे नाट्य”[16]

– **बूनितेए**

७. “नाट्य म्हणजे नटाच्या अभिनयातून प्रकट होणारा व प्रेक्षकांकडून निश्चल मनाने अखंड स्वरूपात ग्रहण केला जाणारा, संपूर्ण प्रयोगातून द्योतित होणारा असा एकात्म अर्थ होय”[17]

८. “नाटक म्हणजे जीवनाचे दर्शन घडविणारा आरसा”[18]

**- भरत**

९. “नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्या द्वारा व्यक्त होणारा संघर्षमय कथात्मक अनुभव”[19]

– **डॉ. भालचंद्र फडके**

१०.“नाट्य भावानुकिर्तनम् लोकवृत्तानुकरणंनाट्य”

– **भरतमुनी**


भरतमुनींनी नाटकाची व्याख्या स्पष्ट करताना नाटकातील अनुकरणाला महत्त्व दिले आहे. तर कालिदासाने व्याख्या सांगताना नाटकातील रस आणि लोकांचे समाधान याला प्राधान्य दिले आहे.

वरील सर्व व्याख्यांच्या विवेचनावरून असे लक्षात येते की ‘नाटक’ या साहित्य प्रकारांविषयी अनेक अभ्यासकांनी त्यांची स्वतःची मते किंवा व्याख्या मांडलेली आहे. तर नाटक म्हणजे मानवी जीवनात घडणाऱ्या अनेक घटनांचे चित्रण समाजासमोर आणणे होय. समाजात घडणाऱ्या अनेक गोष्टींचे हुबेहूब चित्रण नाटकाच्या माध्यमातून नाटककार करत असतो. नाटक ज्या समाजात अवतरते त्या संस्कृतीचे प्रतिकरुप घेऊनच ते अवतरत असते. तसेच नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्याद्वारे व्यक्त होणारा संघर्षमय अनुभव आहे. म्हणजेच नाटकातून जीवनात घडणारा अनेक संघर्षाचे स्वरूप संवाद आणि प्रसंगाच्या द्वारे नाटकातून दाखवले जाते.

एकूण नाटकाचा विचार करताना नाटक हा साहित्यप्रकार इतर साहित्य प्रकारांपेक्षा वेगळा ठरला जातो. समाजातील अनेक प्रश्न, समस्या नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडले जातात. ज्यात ऐकणे आणि पाहणे हे एकाच वेळी घडते त्यामुळे प्रेक्षक ‘नाटक’ अतिशय आवडीने व प्रेमाने पाहायला येतात.

**१.३ नाटकाचे घटक**

नाटकात अनेक गोष्टी असतात. लेखकाला जे काही विषय सांगायचे असतात ते तो नाटकाच्या माध्यमातून लोकांपुढे किंवा समाजापुढे ठेवत असतो. ‘नाटक’ हे अनेक घटकांनी बनलेले असते. त्यात कथानक, विषय, संविधानकाची मांडणी, स्वभावचित्रण, संवादयोजना, संघर्ष, नाट्यसूचना इत्यादी घटकांचा समावेश होतो.




**तक्ता क्र.१.२ – नाटकाचे घटक**

### १.३.१ कथानक

कथानक हा नाटकाचा पहिला व महत्त्वाचा घटक आहे. कोणतेही 'नाटक'कथानकाशिवाय उभे राहू शकत नाही. लेखक त्याला भावलेली एखादी कथा संवादाच्याव्दारे नाटकात व्यक्त करत असतो. ॲरिस्टॉटल ने कथानकासंदर्भात "The plot is the first principla, and as it were, the doul of a tragedy character hold the second place" [20]असे म्हटले आहे. त्यांच्यानुसार कथानक हे नाटकाचे प्राणतत्व आहे. नाटकाच्या कथानकाची सुरुवात व शेवट प्रभावी असली पाहिजे. जेणेकरून प्रेक्षकांना 'नाटक' बघण्याची किंवा वाचण्याचे कुतूहल निर्माण झाले पाहिजे. नाटककार आजचा प्रेक्षकवर्ग डोळ्यांसमोर ठेवून त्यांना आवडेल असा विषय विचारात घेऊन 'नाटक' लिहित असतो. त्याचप्रमाणे आजचे वास्तव कथानकाच्या माध्यमातून व्यक्त होत असते. नाटकात अंक व प्रवेश असतो. नाटकातले कथानक आकर्षक

असले पाहिजे तरच सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रेक्षकांना नाटक आवडते. नाटक परिणामपणे पुढे नेण्यासाठी नाटककार कथानकाची अंक व प्रवेश मध्ये विभागणी करतो.

### १.३.२ पात्रनिर्मिती

पात्रनिर्मिती हा नाटकाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. पात्रनिर्मिती याला स्वभावचीत्रण, व्यक्तिचित्रण, असेही शब्द आहे. नाटकाचे कथानक पुढे नेण्याचे काम हा घटक करत असतो. नाटकाचे कथानक हे पात्रांच्या द्वारे प्रेक्षकांसमोर येते. मानवी जीवनाचे दर्शन पात्रनिर्मितीच्याद्वारे घडविता येते. नाटकाचा विषय पात्रांचाद्वारे उलगडला जातो. त्याचप्रकारे नाटक आकर्षित दिसण्यासाठी नाटककार प्रभावी व्यक्तिरेखांची निवडक करत असतो. ज्या नाटकात पात्रनिर्मिती अधिक प्रभावी असते ते ‘नाटक’ आकर्षित होते. नाटकात तीन प्रकारचे पात्र असतात; **प्रमुख पात्र, दुय्यम पात्र आणि गौण पात्र.** “Action in drama means progressive movement – movement form situation to situation.” सतत काही घडण्यासाठी नाटकात पात्रे हवी असतात. आधी नाटककार पात्राद्वारे स्वभावाचे दर्शन घडवितो आणि प्रेक्षकांना ते दर्शन ‘नट’ घडवितात.” [21]असे सदा कऱ्हाडे यांनी पत्राविषयी सांगितले आहे.

### १.३.३ संवादयोजना

नाट्यसंहितेचा ‘संवाद’ हा प्रमुख घटक आहे. ‘नाटक’ हे पूर्ण संवादावर अवलंबून असते. नाटककार संवादाचाद्वारे कथानक व स्वभावरेखाटण्याचे काम पुढे नेत असतो. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त आशय सांगायचा किंवा मांडायचा असतो. त्यामुळे नाटककाराला अगदी मोजक्या शब्दात त्याला जे सांगायचे आहे ते तो नेमक्या व सोप्या भाषेत आपल्या मनातील विचार संवादाच्याद्वारे मांडत असतो. ‘नाटक’ हा प्रकार संवादाशिवाय घडू शकत नाही असे नाही; परंतु संवादाने ते अधिक प्रभावी बनते. तसेच संवादाच्या माध्यमातून कलाकाराला जे सांगायचे असते ते अतिशय प्रभावीपणे प्रेक्षकांच्या मनात तो प्रसंग पोहोचवला जातो. नाटकात वेगवेगळ्या प्रदेशातील, वातावरणातील पात्रे असतात. त्यांचे परिस्थितीनुसार किंवा प्रदेशानुसार संवाद बदलत जातात. नाटकातील संवाद सरळ, सोपे असले पाहिजे. त्यात कृत्रिमता, अलंकारिता या पासून संवाद दूर ठेवले जाते. नाटकातील संवाद अर्थपूर्ण, सुंदर असावे लागतात.

**१.३.४ घटना- प्रसंग**

नाटकाचे कथानक घटनाप्रसंगाने पुढे जात असते. 'नाटक' प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी लेखक त्यात अनेक घटना किंवा प्रसंगाची निर्मिती करत असतो.

**१.३.५ संघर्ष**

संघर्ष हा नाटकाचा आत्मा असतो. 'नाटक' कोणत्या स्वरूपाचे आहे त्यावर नाट्यगत संघर्ष अवलंबून असतो. नाटकातील संघर्ष हा मानवाच्या जीवनाच्या वास्तवाशी जोडलेला असतो. नाटकात संघर्षाला एक वेगळेच महत्त्व आहे. कारण नाटकात संघर्ष नसेल तर प्रेक्षकांना 'नाटक' प्रभावी वाटणार नाही. 'नाटक' बघत असताना प्रेक्षकांच्या मनात पुढे काय होणार किंवा पुढे काय आहे हे कुतुहल निर्माण होण्यासाठी नाटकात संघर्ष महत्त्वाचा आहे. नाटक प्रभावी होण्यासाठी आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधण्यासाठी संघर्ष महत्वाचा असतो.

**१.३.६ शीर्षक**

शीर्षक हा नाटकाचा एक प्रमुख घटक असतो. अनेकदा नाटकाच्या शीर्षकावरून नाटक कशावर आधारले आहे किंवा नाटकात काय असेल याची सहज कल्पना येते. नाटकाचा विषय हा प्रेक्षकांना आवडेल असा असला पाहिजे. त्याचप्रमाणे समाजाला काही तरी प्रबोधन करण्याचा उद्देशाने लिहिले पाहिजे.

**१ ७.३.भाषा**

नाटकात भाषा ही महत्त्वाची आहे . लेखक 'नाटक' लिहित असताना प्रेक्षकांना समजेल अशी भाषा वापरतो. नाटकातील व्यक्तीमत्वानुसार भाषा बदलत असते. बोली भाषा, प्रमाण भाषा नाटकामध्ये वापरली जाते.

## १.४ समारोप

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'नाटक' या साहित्यप्रकाराची सैद्धांतिक मांडणी केली आहे. नाटक या साहित्यप्रकाराच्या इतिहासाचा आढावा घेतलेला आहे. मराठी रंगभूमीची सुरुवात १८४३ साली सांगली येथे विष्णुदास भावेंच्या 'सीतास्वयंवर' या नाट्यप्रयोगाने झाला. मराठी रंगभूमीची वाटचाल स्पष्ट करताना १८४३ ते आजपर्यंतच्या नाटकांचा आढावा चार भागात घेतला आहे. ते म्हणजे किर्लोस्करपूर्व मराठी नाटक, आधुनिक मराठी नाटक, अत्रे कालीन मराठी नाटक, साठोत्तरी मराठी नाटक. त्यानंतर नाटक या साहित्यप्रकाराचे संकल्पना व स्वरुप स्पष्ट केली आहे. त्यातून नाटक हा साहित्यप्रकार इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळा कसा आहे हे पाहिले आहे. नाटक ही संज्ञा फार प्राचीन काळापासून वापरली जात होती. नाटक या शब्दाची उत्पत्ती कशी झाली आणि अनेक अनेक अभ्यासकांनी दिलेल्या नाटकांचा व्याख्यांचा आढावा घेतला आहे. नाट्य घटकांचे विवेचन केलेले आहे.

भरतमुनींचा 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. नाटकाविषयी लेखन त्यांनी या ग्रंथात मांडले आहे. नंतर नाटकाचे घटकांचा विचार केलेला आहे. नाटकाचे घटक संहिता आणि सादरीकरण अशा दोन अंगाने पुढे जात असते. नाटकात घटक हे महत्त्वाचे असतात. कथानक, पात्रनिर्मिती, संवाद, घटना – प्रसंग, शीर्षक, संघर्ष, आणि भाषा हे महत्त्वाचे नाट्यघटक आहे. एकूण या प्रकरणात नाटकाचा इतिहास , स्वरुप, व्याख्या आणि नाट्यघटकांचे विवेचन केलेले आहे.

## १.५ निष्कर्ष

१. आजच्या भारतीय नाटक आणि रंगभूमीला अत्यंत प्राचीन अशी परंपरा लाभलेली आहे.

२. आधुनिक मराठी नाटकाला बहर जरी २०व्या शतकाचा सुरुवातीच्या काळात आलेला असला तरीही त्याची सुरुवात मात्र १८४३ पासून झालेली आहे.

३. आधुनिक मराठी नाटकावर संस्कृत व इंग्रजी नाटकांचा प्रभाव दिसून येतो.

४. दशावतरी खेळ, भारुडे, बाहुल्यांचे खेळ लोकनाट्यातून प्रेरणा घेवून वर्तमानातील मराठी नाटक समृध्द झाले.

५. १९६० नंतरच्या नाटकांमधून विषय नाविन्य रंगभूमीवर आले.

६. संस्कृत व इंग्रजी नाटकांची प्रेरणा घेऊन मोठ्या प्रमाणात नाट्य निर्मिती झाली.

**संदर्भ**

---

[1] भगत, दत्ता. *मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास ( आरंभापासून १९९० पर्यंत)*. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २०१९ , पृ.२९.

[2] संपादक जोग, रा. श्री. *मराठी वाड्मयाचा इतिहास खंड चौथा (१८०० ते १८७४*). महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे, १९७३, पृ.

[3] बनहट्टी, श्रीनिवास नारायण. *नाट्य व रंगभूमि.*१९५५.

[4] गंधारे, द. के. *मराठी वाड्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल*. शब्दालय प्रकाशन.

[5] गंधारे द. के. *मराठी वाड्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल*, शब्दालय प्रकाशन.

[6] मांडे, प्रभाकर. *लोकरंगभूमी (परंपरा, स्वरुप आणि भवितव्य)* सौ. मधुमिता राजीव बर्वे मॅनेजिंग डायरेक्टर, मधुरज पब्लिकेशन प्र. लि.,२५१ क, शनिवार पेठ, पुणे,२००७. पृ.२७.

[7] मराठे, कृ. बा. *मराठी रंगभूमीचा पूर्वरंग*.

[8] https://en-m-wikipedia-org.translate.goog/wiki/Drama?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=tc

[9] केतकर, गोदावरी. *भरतमुनीचे नाट्यशास्त्र*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दि, १९६२. पृ.९७.

[10] गिंडे, वा. पु. *शेक्सपिअर आणि मराठी 'नाटक'तौलनिक साहित्याभ्यास*. शब्दालय प्रकाशन, पृ.५२

[11] ब्रह्मे, मों. द, *'नटसम्राट एक अभ्यास'*, पृ. ४.

[12] शिरसाठ, शिवदास. *दालित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाट्यविश्व*. कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, २००९. पृ.३६.

[13] ब्रह्मे, मों. द. *'नटसम्राट एक अभ्यास'*. पृ. ५

[14] कानेटकर, वसंत. *'नाटक'एक चिंतन'*. नीळकंठ प्रकाशन, पुणे, १९७४, पृ.१२.

[15] फडके, ना. सी. *नाटक*. प्रतिभासाधन देशमुख आणि कंपनी, पुणे, सा. १९६०, पृ.१५६.

[16]ब्रह्मे, मों. द. *'नटसम्राट एक अभ्यास'*. पृ. ५

[17] देशपांडे, ग. त्र्य. *'भारतीयसाहित्यशास्त्र*. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ति, १९८०, पृ.२६७ – अभिनवगुप्त

[18] https://youtu.be/pPYHV_wHKT8?si=CpxAaBy-Ytd5OynG

[19] संपादक तर्कतार्थ, लक्ष्मणशास्त्री जोशी. *मरठी विश्वकोश खंड ८ वा*, पृ. ४५१.

[20] देशपांडे, वि. भा. *नाट्यव्यक्तिरेखाटन पौराणिक – ऐतिहासिक*. गंधारे द. के – मराठी वाड्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल, शब्दालय प्रकाशन, पृ. क्र. १४८

[21] कऱ्हाडे, सदा. *'शोकनाट्याचे साहित्यरुप'*. पी. पी. एच बुक स्टॉल, मुंबई -४, १९७१, पृ.२५३

# प्रकरण २

# नव्वदोत्तरी मराठी नाटक आणि जयंत पवार

**प्रास्ताविक**......24

**२.१ नव्वदोत्तरी मराठी नाटक** ......24

**२.२ जयंत पवार : व्यक्ती आणि वाड्मय**......26

२.२.१ जीवन व वाड्मय......26

२.२.२ जयंत पवार यांची नाटके व एकांकिका लेखन......27

**२.३ जयंत पवारांनी एकूण लिहिलेले साहित्य** ......27

**२.४ पुरस्कार......30**

**२.५ जयंत पवारांचे अन्य योगदान......30**

**२.६ १९९० नंतरचे मराठी नाटक व जयंत पवारांचे योगदान......31**

**२.७ समारोप......32**

**२.८ निष्कर्ष ......32**

**संदर्भ ......33**

**प्रकरण २**

# नव्वदोत्तरी मराठी नाटक आणि जयंत पवार

## प्रास्ताविक

आजच्या मराठी साहित्यात अनेक बदल झालेला दिसून येतो. अव्वल इंग्रजी काळात मराठी नाटकाचे स्वरूप पौराणिक स्वरूपाचे होते; परंतु नव्वदोत्तरी काळात नाटकाचे स्वरूप पूर्णपणे बदललले दिसून येते. नाटककाराने स्वतः अनुभवलेले तसेच आजुबाजूला पाहिलेले दृश्यांचे चित्रण आजच्या नाटकात मांडलेले आहे. जयंत पवारांनी देखील त्याचप्रमाणे जे पाहिले ते त्यांनी त्यांच्या नाटकातून मांडलेले आहे. जयंत पवारांनी महानगरीय संवेदना, जाणिवा तसेच मध्यमवर्गीय माणसांचे जीवन चित्रित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात नव्वदोत्तरी मराठी नाटकाचे स्वरूप, जयंत पवार या नाटककाराचा परिचय केला आहे. त्यांनी लिहिलेल्या साहित्यकृतीचा परिचय करून नव्वदोत्तरी मराठी नाटकात त्यांनी दिलेल्या योगदानाची चर्चा प्रस्तुत प्रकरणात मांडलेली आहे.

### २.१ नव्वदोत्तरी मराठी नाटक

१९९० नंतर मराठी नाटकाच्या स्वरुपात बदल झालेले आहेत. जागतिकीकरण, आधुनिकीकरण, दहशतवाद, प्रसारमाध्यमांची वाढ इत्यादीमुळे व्यक्तीवादास महत्त्व आले. या कारणामुळे मराठी नाटकाचे स्वरुप बदलले. मराठीत जागतिकीकरणाची संकल्पना १९९१ साली अस्तित्वात आली. १९९० नंतरच्या काळात नाट्यसृष्टीमध्ये बरेच नवे बदल झालेले दिसून येतात. या काळात अनेक नाटककारांनी नाटके लिहिली. महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, विजय तेंडूलकर, वसंत कानेटकर, जयवंत दळवी, शाम मनोहर यासारख्या नाटककार महत्त्वाचे आहे. १९९० नंतरच्या नाटकांचा विचार करताना नवता आणि प्रयोग

या आयामाद्वारे विचार करणे गरजेचा ठरतो.'या कालखंडातील नाटकांनी मराठी रंगभूमीला चैतन्यदायी व समृध्द केले आहे"[1].

जागतिक स्तरावर १९९० नंतरचा काळ हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. नव्वदोत्तरी कालखंडातील महत्त्वाचे अशा नाटककारांचा विचार करताना जयंत पवार, प्रेमानंद गज्वी, संजय पवार, अजित दळवी आणि शफाअत खान यांचा उल्लेख केला जातो. १९९० नंतर झालेले जागतिक, सामाजिक, सांस्कृतिक आदि वास्तवाचे चित्रण या कालखंडातील नाटकातून मांडलेले दिसून येते. बदलत्या सामाजिक परिस्थितीचे स्पष्ट भान या काळातील नाटककाराने मांडलेले आहे. हे वेगळेपण या काळाचे दिसून येते. राजकीय, सामाजिक जे बदल झाले त्याचे एकंदर चित्रण या कालखंडातील नाटकातून दिसून येतात. नाटककार शफाअत खानांनी त्या काळातील हिंदू – मुस्लीम दंगली, वाद त्या काळी अगदी जवळून पाहिल्यामुळे त्यांनी ते त्यांच्या नाटकात व्यक्त केले आहे. 'राहिले दूर घर माझे', 'गांधी आडवा येतो', 'पोपटपंची, मुंबईचे कावळे' अशी नाटके त्यांनी लिहिलेली आहे.

जागतिक पातळीवर दहशतवादाने आदळ आपट केले आहे. दहशतवादाचा सर्वात जास्त परिणाम समाजातील खालच्या स्तरातील गरीब लोकांवर आणि शोषितांवर अधिक प्रमाणात होत आहे. " स्पर्धात्मक बाजारपेठ कार्यक्षमतेची हमी देऊ शकतात. परंतु त्यामुळे समतेची शाश्वती मात्र देता येत नाही आणि बाजारपेठा मानवी विकासासाठी कधीही उपयुक्त ठरू शकत नाहीत"[2]. असे १९९२ च्या मानवी विकास आहवासात म्हटले आहे. जागतिकिरणाबरोबर अर्थस्पस्थेचा कशाप्रकारे मानवी विकासावर परिणाम होत आहे या अहवालात स्पष्ट केले आहे जागतिकीकरणाचा परिणाम समाजातील सर्व लोकांवर झालेला आहे.

"१९८० च्या दशकापासून तिसऱ्या जगातील राष्ट्रांना जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी प्रमाणे रचनात्मक सुधारणे स्वीकारणे अपरिहार्य झाले आणि उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण यांच्या सापळ्यात ही राष्ट्रे अडकली"[3] यामुळे एका बाजूला पहायला गेलो तर बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त द्वार मिळाला तर दुसरीकडे सरकाराने सार्वजनिक क्षेत्रातील वाटा कमी करून खासगीकरणाला मुभा दिली.

## २.२ जयंत पवार : व्यक्ती आणि वाङ्मय

जयंत पवारांनी नाटक आणि कथा अशा दोन प्रकारांमध्ये साहित्यनिर्मिती निर्माण करून त्यांनी आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. त्याचबरोबर ते उत्तम नाट्य समीक्षक होते त्यामुळे नाट्य समीक्षक म्हणून त्यांची एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली. सदर प्रकरणात नाटककार जयंत पवार यांच्या जीवनाचा आणि वाङमयीन कार्याचा परामर्श घेतलेला आहे.

### २.२.१ जीवन व वाङ्मय

जयंत पवार यांचा जन्म १९६० साली मुंबई येथे झाला. परळीच्या गिरणी कामगारांच्या चाळीत ते लहानाचे मोठे झाले. जयंत पवार हे एक नाटककार, पत्रकार आणि नाट्यसमीक्षक होते. त्यांनी वृत्तपत्रामध्ये काम केले तसेच काही काळ गिरणीमध्येही काम केले. त्यांनी त्यांच्या नाटकामध्ये जे अनुभवले, जे वास्तव जवळुन पाहिले त्याचे चित्रण त्यांच्या साहित्यात मांडलेले आहे. जयंत पवारांना आघाडीचे नाटककार असेही म्हटले जाते. जयंत एक प्रयोगशील लेखक आहे. त्यांनी त्यांच्या लेखनातून अनेक वेगळे विषय हाताळलेले आहेत.

जयंत पवारांच्या पत्नीचे नाव संध्या नरे आहे. ती एक लेखिका आहे. जयंत पवार , त्यांची पत्नी आणि मुलगी असा त्यांचा परिवार आहे.[4] गेल्या अनेक वर्षापासून जयंत पवारांची कॅन्सरशी झुंज सुरु होती. प्रदीर्घ आजारानंतर त्यांचे शेवटी निधन झाले. २९ ऑगस्ट २०२१ मध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. वयाचा ६१व्या वर्षी ते निधन पावले.

जयंत पवार हे खूप मोठे नाट्यलेखक तसेच नाट्यसमीक्षक होते. त्यांनी नाट्यलेखन जास्त केले नसले तरी त्यांच्या नाटकातून समाजातील विविध विषय त्यांनी हाताळले आहेत. जयंत पवार यांच्या एकूणच व्यक्तीमत्त्वाचा धांडोळा घेताना एक गोष्ट आपणास टाळता येत नाही; ती म्हणजे मराठीतील विजय तेंडुलकर या नाटककाराचे त्यांच्या जीवनातील असलेले स्थान. तेंडुलकरांच्या नाटकांचे खूप चांगले संस्कार जयंत पवार यांच्यावर झालेले आहेत. जयंत पवार यांचे अधांतर या नाटकाला विजय तेंडुलकरांची छोटीशीच पण या नाटककाराची दखल घ्यायला लावणारी प्रस्तावना आहे.

जयंत पवार हे १९९० नंतर उदयाला आलेले एक महत्त्वाचे लेखक आहे. १९९० नंतर मराठी साहित्यात त्यांनी एकूण वेगळ्या प्रकारचे विषय आपल्या नाटकांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवले. त्यांनी मराठी साहित्यात वैविध्य विषयांवर लेखन केलेले आहे. १९९० नंतरचे एक महत्त्वाचे नाटककार म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी एकंदर त्यांच्या साहित्यकृतीमध्ये मुंबईचे वास्तव मांडले आहे. त्यांच्या साहित्यकृतीकडे पाहताना बहुतेक नाटकांचे केंद्रस्थानी 'मुंबई' हा शहर असलेला पाहायला मिळतो. त्यांनी मुंबई शहरातील लोकांचे जीवन कसे आहे, कशाप्रकारे लोक गावाकडून शहराकडे पोट्यापाण्यासाठी जातात हे सांगितले आहे.

### **२.२.२ जयंत पवार यांची नाटके व एकांकिका लेखन**

जयंत पवार यांनी कथा, नाटक, एकांकिका आदि लेखन केले. त्यांनी जास्त प्रमाणात नाट्य लेखन केले नाही, परंतु जी काही मोजकी नाटके लिहिली त्यातून त्यांनी अनेक नवीन विषय हाताळलेले दिसून येथे. **'अधांतर'** हे नाटक वास्तववादी नाटक आहे. हे वास्तववादी नाटक असून गिरणी कामगारांच्या संपावर कौटुंबिक दृषटिकोनातून भाष्य करणारे हे नाटक आहे.


**'दरवेशी'** या एकांकिकेत जयंत पवार यांनी एक वेगळा विषय मांडलेला दिसून येतो. त्यांनी मालक – मजूर यांचा संघर्ष मांडला आहे. एकंदर ही एकांकिका मालक व मजूर या चिरंतन संघर्षावर आधारित आहे. यातून लेखकाने मालक मजूर यांच्या जगण्याचा संघर्ष हा मूळ विषय घेऊन माणूस कसा बदलु शकतो याची एक कल्पना किंवा परिस्थिती कशी बदलू शकते असा आशावाद मांडला आहे.

त्यांची नाटके ही मुंबईसारख्या माणसांच्या जीवनावर आधारित आहे म्हणजेच एकंदरीत वास्तविक व मध्यमवर्गीय कुटुंबाशी निगडित अशी नाटके त्यांनी लिहिले आहे.


### **२.३ जयंत पवारांनी एकूण लिहिलेले साहित्य**

जयंत पवार हे एक नाटककार तसेच कथाकार व पत्रकार देखील होते. त्यांनी कथा लिहिल्या. 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' व 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोंचा' ह्या कथा त्यांच्या खूप गाजल्या.

त्याचप्रमाणे त्यांनी एकांकिका लेखन केले. आजचे वास्तव त्यांनी आपल्या नाटकाच्या माध्यमातून लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या एकूण साहित्यातून त्यांनी खुप वेगळे व महत्त्वाचे विषय मांडलेले दिसून येतात.




**तक्ता क्र.२.१ कथा**





**तक्ता क्र.२.२ एकांकिका संग्रह**




**तक्ता क्र.२.३ नाटके**




**तक्ता क्र.२.४ भाषांतरीत साहित्य**




**तक्ता क्र.२.५ वैचारिक**

### २.४ पुरस्कार

जयंत पवार यांनी कथा, नाट्यसमीक्षा, तसेच नाटके लिहिली. त्यांची अनेक नाटके गाजली आहे. जयंत पवारांना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने घेतलेल्या नाट्यलेखन स्पर्धेत ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकासाठी जयंत पवारांना सर्वोत्कृष्ट लेखनाचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे. २०१२ चा साहित्य अकादमी पुरस्कार जयंत पवार यांच्या लेखनाला प्राप्त झालेला आहे. तसेच ‘अधांतर’ या नाटकाला राम गणेश गडकरी महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार प्राप्त झाला.अधांतर या नाटकाला जयवंत दळवी स्मृती नाट्यलेखन पुरस्कार मिळाला. तसेच या नाटकाला महाराष्ट्र फाऊंडेशन ललित साहित्य गौरव, नाट्यदर्पण आदि १४ विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार व रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कारांसह अनेक पुरस्कार काय डेंजर वारा सुटलाय या नाटकासाठी त्यांना मिळाले आहेत.

### २.५ जयंत पवारांचे अन्य योगदान

जयंत पवार एक नाटककार म्हणून जेवढे प्रसिद्ध होते तेवढेच ते कथाकार म्हणूनही त्यांची ओळख होती. त्यांनी मराठी साहित्यात आपले स्वतंत्र स्थान प्राप्त केलेले आहे. ‘दरवेशी’, ‘मेला तो देशपांडे’, ‘होड्या’, ‘घुशी’, ‘वाळवी’, ‘लिअर’, ‘विठाबाईचा कावळा’, ‘अशांती पर्व’, ‘अंतिम रेषा आणि द्वंद’, ‘जाळिताचा हंगाम’, ‘अजून एक पक्षी’, ‘शेवटच्या बीभत्साचे गाणे’ आदि २३ एकांकिकांचे लेखन त्यांनी केले आहे.

जयंत पवारांनी अगदी सखोल जाऊन लेखन केलेले जाणवते. कारण त्यांनी जे विषय घेऊन लेखन केले आहे ते सोपे सरळ नसून राजकारण, स्त्रीचे घराशी असलेले जैविक संबंध, गिरणी कामगारांचे प्रश्न असे अनेक  विचार करण्याला प्रवृत्त करण्यासारखे विषय त्यांच्या एकुण साहित्यातून मांडलेले आहे. त्यांनी हिंदीत देखील पुस्तकं लिहिली . त्यांनी मराठी साहित्यात मौलिक भर टाकली आहे. भविष्यात देखील विलक्षण साहित्य निर्माण करण्याची शक्यता होती परंतु प्रदीर्घ आजाराने त्यांचे निधन झाले आणि त्यांचा लेखनाचा प्रवास संपुष्टात आला.

जयंत पवारांनी मराठी एकांकिकेची परंपरा समृध्द केलेली आहे. त्यांच्या सर्व एकांकिकेचा आशय आगळा वेगळा आहे जेणे करून त्यांची मराठी साहित्यात एकांकिकेने एक वेगळे योगदान दिलेले आहे. पवारांनी केवळ नाटक व एकांकिका हेच हाताळले नाही तर त्यांनी मराठी साहित्यामध्ये कथाकाराची भूमिका देखील स्वीकारली. त्यांचे कथासंग्रह भाषा, पात्रे, संवाद या विविध अंगाने नाविन्यपूर्ण होती.

जयंत पवारांनी विविध मासिके, वृत्तपत्रे तसेच आजच्या काळात डिजिटल माध्यमांसाठीही भरपूर लेखन केले. त्यांचे प्रत्येक लेख वाचण्यासारखे असतात. त्याचप्रमाणे ते एक मोठे नाट्यसमीक्षक होते. मराठी, हिंदी, हॉलिवूड अशा विविध चित्रपटांची समिक्षा त्यांनी केली आहे.

## २.६  १९९० नंतरचे मराठी नाटक व जयंत पवारांचे योगदान

नव्वदोत्तरी नाटकांमध्ये संजय पवारांचे “कोण म्हणत टक्का दिला”? हे नाटक महत्त्वाचे ठरते. या नाटकातून त्याने शोषितांचे , दलितांचे तसेच राजकारणाचे प्रश्न मांडले आहे. त्याचप्रमाणे विवाहसंस्थेवर हल्ला करणारे नाटक त्यांनी लिहिली ‘ दोन अंकी नाटक’, ‘आम्ही जातो अमुच्या गावा’ आदि. प्रशांत दळवी यांनी स्त्रीच्या स्वातंत्र्याचा शोध ‘चारचौघी’ या नाटकातून घेतलेला आहे. ही काही महत्वाचे नाटके या कालखंडातील आहे.

जयंत पवार हे एक उत्कृष्ट नाटककार म्हणून पुढे आलेले समर्थ नाव आहे. त्यांनी नाट्यक्षेत्रात आपले एक वेगळे स्थान प्राप्त केले आहे. नाट्यक्षेत्राला त्यांनी एक वेगळी उंची प्राप्त करून दिली आहे.

नव्वदोत्तरी काळात जयंत पवारांनी नाटके लिहून त्यातून वेगवेगळे वास्तवाशी भिडणारे विषय, गिरणी कामगारांच्या संपामुळे झालेली कुटुंबाची उध्वस्तेची कहाणी त्यांचा नाटकातून मांडलेली आहे.

महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, विजय तेंडूलकर, प्रशांत दळवी ह्या नाटककारांबरोबर जयंत पवारांचे नाव घेतले जाते. त्यांच्या एकांकिका, कथा, त्यांनी केलेल्या नाट्यसमीक्षा यामुळे त्यांचे नाव परिचयाचे झालेच परंतु त्यांचे पहिले नाटक 'अधांतर' ज्यावेळी पुढे आले त्यावेळी खऱ्या अर्थाने जयंत पवार हे मराठी रंगभूमीवर गाजले.

## २.७ समारोप

सदर प्रकरणांमध्ये नव्वदोत्तरी कालखंडातील नाटकांविषयी थोडक्यात चर्चा केलेली आहे. त्याच्यानंतर जयंत पवार या लेखकाचा परिचय जाणून घेतला. जयंत पवार हे प्रयोगशील लेखक असल्याचे दिसून आले. त्याचबरोबर जयंत पवार यांनी एकंदर लिहिलेले साहित्य, त्यांना प्राप्त झालेले पुरस्कार याचा आढावा घेतला आहे. नव्वदोत्तरी नाटक आणि जयंत पवार यांनी या कालखंडात दिलेल्या  योगदानाचा विचार या प्रकरणाद्वारे केलेला आहे.

## २.८ निष्कर्ष

१) नव्वदोत्तरी कालखंडातील वैशिष्ट म्हणजे नवेपणाचा शोध घेणे होय..

२ ) नव्वदोत्तरी कालखंडात विषय नाविन्य दिसून येते.

३ ) जयंत पवार यांनी त्यांच्या नाटकातून महानगरातील वास्तव मांडून या कालखंडातील नाटकात आपले एक वेगळे स्थान प्राप्त केले आहे.

४) नव्वदोत्तरी कालखंडातील नाटककारांनी नाट्यलेखनात वेगवेगळे प्रयोग करून जागतिकीकरणाचा प्रभाव त्यांच्या नाट्य आशयातून अधोरेखित केलेला आहे.

५ )१९९० नंतरच्या नाटकाच्या आशयात विषय नाविन्य हे वेगळे प्रयोग या काळाचे वैशिष्ट आहे.

६ ) जागतिकीकरणाच्या आगमनाने १९९० नंतर समाजातील बदलत्या वृत्ती प्रवृत्ती यांचे चित्रण या काळातील नाटकातून दिसून येते.

**संदर्भ**

---

[1]संपादक, नाईकवाडे,राजेंद्र. जयस्वाल, राजन. *'समकालीन मराठी रंगभूमि'*, सचिन उपाध्याय विजय प्रकाशन हनुमान गल्ली, सीतबर्डी नागपूर,४४००१२,२०१०

[2] पाटील,भारती . *'स्त्रिया समाज आणि राजकारण'*, प्रकाशक सुशील लक्ष्मण धसकटे, पृ. ३३

[3] पाटील,भारती . *'स्त्रिया समाज आणि राजकारण'*, प्रकाशक सुशील लक्ष्मण धसकटे, पृ. ३३

[4] https://marathi.latestly.com/maharashtra/veteran-author-journalist-jayant-pawar-passes-away-at-the-age-of-61-282128.html/amp

## प्रकरण ३

# जयंत पवारांच्या नाटकातील महानगरीय संवेदना व बदलत्या समाजवास्तवाचे चित्रण


प्रास्ताविक..........................................................................................................36

**३.१ महानगरीय साहित्य..........................................................................................36**

**३.१.१ महानगरीय समाजजीवनाची वैशिष्टे..........................................................37**

**३.१.२ मुंबई एक महानगर..........................................................................................37**

**३.२ महानगरीय समाजवास्तव व महानगरीय संस्कृती..............................................38**

**३.३ 'अधांतर' : महानगरीय जाणीवा व समाजवास्तवाचे चित्रण..............................38**

**३.३ .१ 'अधांतर' नाटकातील पात्रे..............................................................................39**

**३.३ .१.१ आई:-..............................................................................................................39**

**३.३ .१.२ बाबा..............................................................................................................39**

**३.३.१.३ नरू:-..............................................................................................................39**

**३. ३.१.४ मंजू..............................................................................................................40**

**३. ३.१.५ मोहन..............................................................................................................40**

**३. ३.१.६ इतर:-..............................................................................................................40**

**३.४ 'काय डेंजर वारा सुटलाय': महानगरीय जाणीवा व समाजवास्तवाचे चित्रण ..............40**

३.४.१ परिचय......................................................................................40

३. ४.२ विषय ......................................................................................41

३. ४. ३ ‘काय डेंजर वारा सुटलाय’ : चंगळवादी संस्कृती..............................................42

३. ४ .४ ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकातून आलेली पात्रे....................................42

३.५ ‘माझं घर’ : महानगरीय जाणीवा व समाजवास्तवाचे चित्रण ......................................45

३.५ .१ परिचय......................................................................................45

३.५ .२ माझं घर या नाटकातील व्यक्तिचित्रण...................................................45

३.६ समारोप......................................................................................48

३.७ निष्कर्ष......................................................................................48

संदर्भ......................................................................................48

# प्रास्ताविक

जयंत पवार हे आजच्या पिढीतील एक नवे प्रयोगशील नाटककार आहेत. त्यांनी त्यांच्या नाटकातून एकंदर आजच्या शहराचे वास्तव मांडलेले आहे. महानगरात लोकांची होणारी कोंडी, त्यांना होणारे त्रास, त्यांचे प्रश्न आदि विषयांवर जयंत पवार यांनी प्रकाश टाकलेला आहेत.

'जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास' या प्रबंधिकेत जयंत पवारांच्या नाटकातून दिसून येणाऱ्या महानगरीय संवेदना व बदलत्या समाजवास्तवाचा विचार करण्यापूर्वी 'महानगरीय' साहित्यप्रकाराचा थोडक्यात परिचय करून घेणे आवश्यक ठरेल. एकूण महानगर ही संकल्पना, तेथील जीवन, जाणीवा इत्यादींची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महानगरीय जाणिवा, समाजवास्तव कसे व्यक्त होते व जयंत पवार यांनी त्यांच्या नाटकातून या जाणिवा कशाप्रकारे व्यक्त केले आहे याचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरेल.

प्रस्तुत प्रकरणात जयंत पवार या लेखकाने त्यांच्या नाटकातून कोणते विषय हाताळले आहे याचा अभ्यास केला जाणार आहे तसेच जागतिकीकरण झाल्यामुळे काही विशिष्ट असा प्रभाव जयंत पवारांच्या नाटकातून झालेला आहे का? याचा अभ्यास देखील या प्रकरणाव्दारे केला जाणार आहे.

### ३.१ महानगरीय साहित्य

आधुनिक साहित्याचा काळ म्हणजेच महानगरीय साहित्याचा काळ आहे. महानगर हे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून आकाराला आली आहे. मुंबईसारखी महानगरे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून आली आहे. इतर साहित्यप्रकारांपेक्षा महानगरीय साहित्य हे वेगळे आहे कारण अर्थातच महानगरातील संस्कृती ही इतर समाजजीवनापेक्षा वेगळी असल्याचे दिसून येते. महानगरात जगणाऱ्या प्रत्येक व्यक्तींचे अनुभवविश्व हे वेगळे आहे. त्या परिसरातील राहणाऱ्या व्यक्तींच्या वाट्याला आलेले अनुभव हे अर्थातच ग्रामीण, शहरी जीवनापेक्षा वेगळे आहे. महानगरीय साहित्य हे इतर समाजजीवनापेक्षा वेगळे व वैशिष्टपूर्ण आहे.

### ३.१.१ महानगरीय समाजजीवनाची वैशिष्टे

"२० व्या शतकाच्या मध्यांतर कापडउद्योग, कारखानदारी, चित्रपटनिर्मिती, अभियांत्रिकी ई. व्यवसाय जोमाने वाढले"[i]. अनेक राजकीय तसेच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक या घटनांनी महानगरातले समाजजीवन ढवळून टाकले. महानगरीय समाजजीवनाची पुढील प्रमाणे काही वैशिष्ट्ये:-

- ❖ **महानगरीय जीवन हे गतिमान आहे.:-** महानगरातील माणसे सतत नोकरीसाठी/ व्यवसायासाठी धावपळ करत असतात.
- ❖ महानगरात अनेकस्तरीय लोकसमूह राहतात. उदाहरणार्थ उच्च मध्यमवर्गीय माणूस, गरीब, श्रीमंत माणूस, मजूर, कनिष्ठ वर्ग, काही झोपडपट्टीत राहतात. अशा अनेक प्रकारची माणसे महानगरात पाहायला मिळतात.
- ❖ महानगरात स्पर्धा, वाद, संघर्ष सतत चालू असतात त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

### ३.१.२ मुंबई एक महानगर

मुंबई हे शहर खुप प्रसिद्ध आहे. ते जागतिक स्तरावरील प्रमुख शहर आहे. मुंबईत अनेक चळवळींची सुरुवात झाली. "मुंबईला भारताचे प्रवेशद्वार म्हणून संबोधले जाते"[ii]. मुंबई हे शहर कापडउद्योगांचे केंद्र आहे. मुंबई महानगराचे 'सांस्कृतिक विविधता' हे महत्त्वाचे वैशिष्टे आहे. विविध देशातील लोक, विविध धर्मपंथांचे, वेगवेगळ्या भाषिक लोक रोजगारांच्या निमित्ताने येथे स्थायिक झाले आहेत. या शहरातून विविध भाषेतील नियतकालिका, वर्तमानपत्रे प्रसिद्ध होतात.

महानगरीय जाणिवांचे केंद्र 'मुंबई' आहे. मुंबई महानगर अनेक लोकांना आकर्षित करते म्हणून तिकडे स्थलांतरितांचे ओघ नेहमी सुरू असलेले दिसून येतात. यामुळेच मुंबईच्या लोकांची संख्या कायम वाढत राहिलेली दिसते. मुंबई शहर हे मोठे शहर आहे जिकडे हजारो लोकसंख्येने लोक राहतात. तरी मोठा लोकसमुह असूनही महानगरात एकटेपणाची जाणीव नेहमी भासत असते. हे महानगर कामगारांनी व्यापलेले आहे. विविध भागातून, प्रदेशातून कामगार पोटापाण्यासाठी येथे विविध व्यवसाय करतात.

### ३.२ महानगरीय समाजवास्तव व महानगरीय संस्कृती

स्वातंत्र्योत्तर कालखंडांत औद्योगिक क्रांती, तंत्रज्ञान आणि वेज्ञानिक प्रगतीमुळे नवीन वसाहती निर्माण झाल्या. महानगरात विविध लोकसमुहाचे लोक राहतात. महानगरात राहणाऱ्या लोकांची भाषा मिश्रित स्वरूपाची असतात कारण तिथे वेगवेगळ्या भागातून लोक रोजगारासाठी येत असतात.

महानगरात केवळ श्रीमंत माणसे ररहत नाही तर कष्ट करून पैसे कमावणारे लोक तसेच दुसऱ्यांचे घर उध्वस्त करणारे अशा अनेक वृत्तीचे लोक महानगरात पाहायला मिळतात.

### ३.३ 'अधांतर' : महानगरीय जाणीवा व समाजवास्तवाचे चित्रण

'अधांतर' हे जयंत पवार यांचे पहिले नाटक आहे जे १९९९ साली लिहिले गेले. हे एक वास्तववादी नाटक आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर आधारित हे नाटक आहे. जयंत पवार यांनी मुंबई शहराचे वास्तव या नाटकात मांडलेले आहे. गिरणी संपाने उध्वस्त झालेल्या कुटुंबाची व्यथा या नाटकातून चित्रित केलेली आहे. या नाटकाची पूर्ण कथा चाळीतील एका कुटुंबाभोवती फिरते. जयंत पवारांचे बालपण 'लालबाग परळ' वसाहतीत गेल्यामुळे त्याच्या लेखनात त्या भागातील परिसराचे चित्रण उमटलेल्या दिसतात. अधांतर या नाटकामुळेच त्यांना व्यावसायिक रंगभूमीवर वेगळी ओळख प्राप्त झाली. त्यांच्या अधांतर या नाटकावर लालबाग परळ चित्रपट आला आहे.

अधांतर हे नाटक मुंबईतील गिरणी कामगारांच्या संपानंतर झालेल्या घटनांचे चित्रण आहे. मुंबईतील 'धुरी' कुटुंबाची ही कथा आहे. केवळ धुरी कुटुंबाची कथा असली तरी आणखी लाखो कामगारांची आर्थिक स्थिती कशी बदलत गेली त्याचे हे नाटक प्रातिनिधिक रूप आहे.

'अधांतर' ह्या नाटकामध्ये आईची व्यक्तिरेखा लेखकाने सुंदर प्रकारे रेखाटलेले आहे. स्त्रियांचे संघर्ष त्यांचा नाटकातून दिसून येतात. स्त्रिया समोर आलेल्या परिस्थितीला न घाबरता कशी खंबीरपणे परिस्थितीशी लढत सामोरे जाते याचे चित्रण लेखकाने केलेलं आहेत. जयंत पवारांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन संवेदनशील असल्याचे दिसून येतात.

**३.३ .१ 'अधांतर' नाटकातील पात्रे**

अधांतर या नाटकामध्ये स्त्री तसेच पुरुष पात्र आहेत. आई, नरू, मोहन, मंजू बाबा ही या नाटकातील मुख्य पात्र आहेत. तसेच अण्णा सावर्डेकर मामी इतर गौण पात्र आहेत.

**३.३ .१.१ आई:-**

आई ही अण्णांची पत्नी आहे. अण्णा गेल्यामुळे ती विधवा स्त्री झाली आहे. आई ही अगदी शांत स्वभावाची आहे तसेच दुसऱ्यांचे पाप पोटात घालणारी व सगळ्यांना सांभाळून घेणारी अशी ही स्त्री व्यक्तिरेखा या नाटकातून दिसून येते.

आईना तीन मुले असतात. नरू, मोहन व मंजू. कुटुंबासाठी पैसे कमावणारा माणूस मरण पावल्यामुळे कुटुंबाची परिस्थिती कशी होते त्याचे चित्रण लेखन नाटककार जयंत पवार यांनी या नाटकातून मांडलेले आहे. ही परिस्थिती आईला भगवत नाही. अण्णा निधन पावल्याने आई म्हणजेच त्यांची पत्नी सर्व कुटुंबाचा गाडा चालवते.

**३.३ .१.२ बाबा**

बाबा हा अण्णांचा तोडला मुलगा आहे. तू स्वतःला लेखक व समीक्षक समजत असतो. त्याला नोकरी करायला आवडत नसे. नोकरी न करता जगणे हीच त्याची वृत्ती होती. बाबा हा कोणाशी जास्त बोलत नाही तो केवळ कवी असलेल्या माणसांची तसेच लेखकाशी मात्र मैत्री करतो. बाबा मोठा मुलगा असून त्याने घराच्या परिस्थितीत मदत करण्याऐवजी तो कुटुंबावरच भार बनतो. तो साहित्याचा वेळा असतो. साहित्याशिवाय त्याला आणखी काही सुचत नाही.

**३.३.१.३ नरू:-**

नरू हा तिसरा मुलगा आहे. नरू गुंडागिरी करण्यात अगदी हुशार असतो. तो कधीच घरी जास्त वेळ असत नाही नरू हा दुसऱ्यांशी भांडण करत राहतो. आई सतत त्याच्या काळजीत राहते. नरू भांडण वगैरे करून तुरुंगात जाईल ही भीती आईला वाटत असते. मंजूच्या प्रिय कराचा त्यांनी खून केला होता तेव्हा तो तुरुंगात गेला होता. असा हा सर्वात धाकटा पण गुंड प्रवृत्तीचा माणूस आहे

### ३. ३.१.४ मंजू

मंजू ही राणे कामगाराची पत्नी आहे. ती खूप धाडसी आहे. प्रेम आणि संपत्ती शोधणाच्या प्रयत्नात ती श्रीमंत विवाहित शेजाऱ्यासोबत लैंगिक संबंध ठेवण्यास मागेपुढे पाहत नाही. तिच्या गरोदरपणाबद्दल आणि तिच्या दुष्कृत्यांचा खुलासा केल्यावर , तिच्या कुटुंबाने तिचे लग्न एका विधुर राणेशी बळजबरीने केले ज्याला तिच्यासाठी वेळ नाही आणि बहुतेक मद्यधुंद होवून स्वताच्या जगात गुंतलेला असतो .

### ३. ३.१.५ मोहन

मोहन हा दुसरा मुलगा असतो त्याला क्रिकेट हा खेळ खूप आवडतो. तो सुद्धा टीव्ही पुढे क्रिकेटची कॉमेंट्री ऐकत असतो. एकंदर तो क्रिकेट वेडा आहे.

### ३. ३.१.६ इतर:-

‘अधांतर’ या नाटकातील अण्णा, सावर्डेकर मामी या पात्रांचा समावेश या नाटकातून झालेला आहे . अण्णा हे पात्र रंगमंचावर कुठेच आले नाही त्यांचे एकही संवाद नाही. अण्णांचे निधन झाल्याने त्यांचा केबळ फोटो नेपथ्यात आहे. घरातील कमवत असलेला माणूस जेव्हा एखाद्या दिवशी मरण पावतो तेव्हा त्या कुटुंबाची कशी अवस्था होते याचे चित्रण या नाटकातून केलेले आहे.

## ३.४ ‘काय डेंजर वारा सुटलाय’: महानगरीय जाणीवा व समाजवास्तवाचे चित्रण

जयंत पवार यांच्या ‘काय डेंजर वारा सुटलाय!’ हे नाटक २०१० साली रंगमंचावर महाराष्ट्र संस्थेतर्फे सादर झाले व त्याची संहिता २०११ साली पॉप्युलर प्रकाशनतर्फे प्रकाशित झाली. काय डेंजर वारा सुटलाय ह्या नाटकात जयंत पवारांनी नव्वदनंतर झालेले महानगरात बदल, जागतिकीकरण, औद्योगिकीकरण यामुळे झालेले बदल यांचे चित्रण त्यांनी त्यांच्या नाटकामध्ये उमटले आहे.

### ३.४.१ परिचय

‘काय डेंजर वारा सुटलाय’ हे दोन अंकी नाटक आहे. नाटकाचा आशय राजकीय आणि सामाजिक असा मिश्र स्वरूपाचा आहे. या नाटकात मध्यमवर्गीय माणूस तसेच सर्वसामान्य माणूस मुंबई शहरामध्ये आपले अस्तित्व टिकवण्यासाठी उद्योगपती, बिल्डर, राजकीय शक्ती यांच्या वर्चस्वपुढे चालणारी धडपड त्याचप्रमाणे

त्यांच्यावर होणारे अन्याय या वास्तवाचे व सद्यस्थितीचे वर्णन या नाटकातून घडते. हे नाटक राजकारणी, बिल्डर लॉबी व उद्योगपती या तीन सुत्राभोवती फिरताना दिसते.

औद्योगिकीकरण व जागतिकीकरण यामुळे मुंबई शहराचा विकास करण्यासाठी तेथील मध्यमवर्गीय व सामान्य माणसांना हटवण्याचा निश्चय यांनी मांडलेला आहे हेच वास्तव या नाटकात लेखक जयंत पवार यांनी मांडलेले आहे.

जयंत पवार यांनी 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकातून अस्सल महानगरीय जीवन जगणाऱ्या माणसांची वृत्ती,त्यांचे जीवन, त्यांना होणारा त्रास, माणसांची समस्या आदि महानगरीय जाणीवा नाटकातून व्यक्त केलेले आहेत. या नाटकातून माणूस महानगरात कशाप्रकारे जीवन जगतात याचे उत्तम चित्रण नाटककार जयंत पवार यांनी केलेले आहेत. मध्यमवर्गीय माणूस व उच्चवर्गीय माणूस यांची जगण्याची पद्धत कशी वेगळी आहे त्याचप्रमाणे उच्चवर्गीय माणूस आपल्या मुलांसाठी Sea faced apartment पाहिजे म्हणून त्याच्या मुलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी एका मध्यवर्गीय कुटुंबाचे घर कसे हिसकावून घेतो याचे चित्रण करणारे हे नाटक आहे. श्रीमंत माणूस आपल्याकडे सगळे काही असूनही मध्यमवर्गीय माणसांचा विचार न करता आपली इच्छा किंवा हौस कशी पूर्ण करतात हे या नाटकातून दिसून येतात.

### ३. ४.२ विषय

'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाचा विषय केवळ सामाजिक स्वरूपाचा नसून सामाजिक आणि राजकीय असा संमिश्र विषय आहे आणि आजच्या कालखंडामध्ये समाजाच्या प्रत्येक प्रश्नाला राजकारण कसे संबंधित आहे. प्रत्येक सामाजिक प्रश्नांचे राजकारण केले जाते, हे आजच्या शहरी जीवनाचे सत्य आहे. राजकारणाचा एक भाग आजच्या सामाजिक प्रश्नांमध्ये घुसवला जातो आणि ह्याचे चित्रण जयंत पवारांनी केलेले आहेत.

या नाटकाची भाववृत्ती शोकात्म स्वरूपाची आहे. एकंदर मध्यमवर्गीय माणसाची भाववृत्ती दर्शवणारी शोकात्मिका जयंत पवारांनी या नाटकाच्या माध्यमातून मांडला आहे. या नाटकामध्ये दाभाडे हा पात्र सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणूस आहे. त्या बिचाराची छोटीशी जागा असते. ती जागा देखील बळकवण्यासाठी

अनेक खेळ खेळले जाते. त्याला खूप त्रास दिला जातो व नंतर त्याच्या आयुष्याची झालेली एकूण शोकांतिका या नाटकामध्ये मांडलेली आहे. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांचा संमिश्रण आजच्या साहित्यामध्ये दिसून येतो व त्याचे जयांत पवार या लेखकाने आपल्या काय डेंजर वारा सुटलाय या नाटकातून ते प्रश्न उत्तम प्रकारे मांडलेले आहे. त नाटकांमध्ये त्यांनी केवळ प्रश्न मांडलेले नाही तर सामाजिक प्रश्नांमध्ये राजकीय प्रश्न कसे दिसतो हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या नाटकामध्ये केवळ एक नाही तर अनेक महानगरीय विषय प्रस्तुत नाटकामधून आलेले आहे म्हणून या कालखंडातले महानगरीय जाणिवांना चांगल्या पद्धतीने न्याय देणारे महत्त्वाचे नाटककार तसेच कथाकार म्हणून जयंत पवारांचा उल्लेख करावा लागतो.

### ३. ४. ३ 'काय डेंजर वारा सुटलाय' : चंगळवादी संस्कृती

'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकातून लेखक जयंत पवार यांनी वाचकाला अनेक गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहेत. यातून माणसांची चंगळवादी संस्कृती दिसून येतात. माणूस आपल्याकडे बंगले असूनदेखील इतरांसाठी मोठ- मोठ्या बिल्डिंग तयार करतो पण तरी मला इतरांची जागा बळकावून तिथे माझं काही तरी अजून नवीन बांधायचे आहे ही चंगळवादी संस्कृती या नाटकातून दिसून येते. तसेच नुसता भोग घायचा नाही सगळ्या गोष्टींचा, सगळ्या संपत्तीचा आणि याचे चित्रण बिल्डरच्या माध्यमातून झालेला आहे. या नाटकात मोठा बिल्डर गृहस्थ म्हणून आलेला आहे. त्याला त्याचा मुलाला समुद्राभिमुख अपार्टमेंट ( Sea faced apartment ) हवीय म्हणून दाभाडेंची जी छोटी जागा आहे ती तो बळकवण्याचा प्रयत्न करतो. तो मोठा बिल्डर असून एका मध्यमवर्गाचा छोटासा कोपरा समुद्रकिनारे असल्यामुळे त्याला ती जागा आपल्या मुलासाठी हवी असते. सगळ्या गोष्टींचा भोग फक्त मला घ्यायचा आहे ही जी चंगळवादी संस्कृती महानगरामध्ये निर्माण झालेली आहे याचा चांगल्या पद्धतीने चित्रण या नाटकामध्ये झालेला आहे.

### ३. ४ .४ 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकातून  आलेली पात्रे

जयंत पवारांच्या नाटकामध्ये आलेली पात्र ही विस्तापित झालेली लोक आहेत. अनेक गावातून आलेली लोक आहे. त्यांची भाषा विचारात घेताना गुजराती भाषेचा वापर झालेला आहे. मारवाडी तसेच

मुंबईसारख्या शहरामध्ये काम करण्यासाठी, बिझनेस करण्यासाठी येतात त्या भाषेचा वापर दिसून येतात. बबन येलमामे याच्या माध्यमातून मराठी बोलीचाही झालेला आहे. अनेक बोली भाषांचा वापर या नाटकातून झालेला आहे. यावरून असे लक्षात येते की महानगरात राहणारी माणसे मुळची तिथली नसतात तर अनेक गावातून विस्तापित झालेले लोक महानगरात पाहायला मिळतात. महानगरात येणारी लोक ही रोजगार आणि अनेक वृतींचा शोधात तिथे आलेली असतात याचे चांगले चित्रण या भाषेच्या माध्यमातून लेखकाने रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाचा विचार करताना या नाटकातील पात्रांचा विचार करणे महत्त्वाचा ठरतो.या नाटकातील पात्रे ही वास्तवातील जीवन जगणारी पात्रे आहेत. 'दाभाडे' हे पात्र ह्या नाटकात प्रमुख आहेत त्याचबरोबर 'बबन' हा ही तितकाच महत्त्वाचा आहे. या दोन पात्रांभोवती हे संपूर्ण नाटकाचे कथानक गुंफलेले आहे. ह्या नाटकातून आलेल्या पात्रांच्या माध्यमातून लेखकाने महानगरातल्ये वास्तव तसेच महानगरातील मध्यमवर्गीय माणसांचे जीवन, त्यांची जाणीवा या नाटकातून व्यक्त केली आहे. या नाटकातून आलेली सर्व पात्रे महानगरीय जीवन जगणारी मध्यमवर्गीय आहे.

**३. ४.४.१ दाभाडे :-**

'दाभाडे' हे पात्र या नाटकातील मुख्य पात्र आहे. त्याचे पूर्ण नाव सत्यविजय नरहरी दाभाडे आहे. तो इंदौरहून महानगरात आपले आयुष्य स्थायिक करण्यासाठी महानगरात आलेला असतो. तो 'सेफ इंडिया इन्शुरन्स' कंपनीमध्ये डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून काम करीत असतो. जवळपास तीस वर्षे तो मुंबई शहरात राहत होता. दाभाडे हे एक मध्यमवर्गीय कुटुंब आहे. त्याला महानगरात राहून तीस वर्षे झाली. या तीस वर्षात त्यांनी हजारो माणसांचे जीवन सुरक्षित बनवले आहे. त्याचे कुटुंबावर खुप प्रेम असते. दाभाडे यांनी आपले आयुष्य महानगरात येऊन काम कष्ट करून त्याने त्याचा एक छान नीटनेटका संसार ठेवलेला असतो. लग्नानंतर 'कुसुमकंज' सोसायटीत त्यांनी एक घर घेतले.

दाभाडे याचे एक छोटेसे कुटुंब असते. दाभाडे, त्याची बायको, मुलगा बंटी आणि मुलगी चिंगी अशा चार जणांचा चौकोनी कुटुंब आहे. बंटी हा टी. व्ही सिरियलमध्ये काम करत असतो आणि चिंगी

महाविद्यालयात शिक्षण घेत असते. दाभाडे हे पात्र प्रामाणिक व साधा आहे. नंतर त्याच्या आयुष्यात दरिद्रपणा येतो. त्याच्या आयुष्यात भयानक वादळ येते. त्याला त्याचे स्वतःचे घर रिकामे करण्याची जबरदस्ती केली जाते. घर रिकामे करण्यासाठी त्याला वेगवेगळया प्रकारची अमिषं, प्रलोभने दाखवली जातात.

दाभाडे मात्र घर खाली करायला तयार होत नाही. तो त्यांना नकार देतो. शेवटी दाभाडे ऐकत नसल्याने त्याच्यांवर गुंडागिरी सुरू होते. त्यांच्या घरातील सामान गुंडे बाहेर फेकतात.

दाभाडेंच्या कुटुंबावर जबरदस्ती करतात. त्याच्या मुलाला तसेच मुलीला मारतात. त्यांना मारहाण करतात. या भीतीने मुलगा घराचा त्याग करून घर सोडून जातो व मुलगी मामाच्या घरी जाऊन राहते. दाभाडेची बायको देखील त्याच्याजवळ थांबत नाही ती पण त्याला एकट्यालाच सोडून मुलांच्या सुरक्षेसाठी भावाकडे जाऊन राहते. पण दाभाडे मात्र त्यांना घाबरून तिकडून पळत नाही. तो बिचारा एकटा तिकडे राहतो. त्यांच्या घराची दोन खोल्यांमध्ये वाटणी होते. एक खोली दाभाडेची व दुसरी गुंडांची अशी त्यांची घराची विभागणी होते. ह्या सर्व घटनेत एक मुन्ना नावाचा गुंडाला दाभाडेची दया येते. पण इतरांना त्याचे वागणे पटत नसल्याने त्या बिचाऱ्याला ते मारून टाकतात.

**३.४ .४.२ बंटी आणि चिंगी:-**

बंटी हा दाभाड्याचा मुलगा आहे आणि चिंगी ही त्याची मुलगी आहे. बंटी टी. व्ही सिरियलमध्ये काम करत असतो. चिंगी महाविद्यालयात शिक्षण घेत असते.

**३.४ .४.३ बबन येलमामे :-**

बबन हा रोजगारासाठी महानगरात आलेला पात्र आहे. तू पोट भरण्याचा उद्देशाने येथे आलेला आहे. त्याला जी कामे शक्य असते ती तो करत असतो. त्याचे लग्नही झालेले असते. बबन याचे दुःख पाहून वाचकाच्या मनात दुःखाचे वातावरण निर्माण होते. त्याची बायको गरोदर असते. बबन हा कष्ट करून जीवन जगणारा माणूस आहे. त्याला घरात राहायला घर नाही. बबनला पोलीस खूप त्रास देत असतात. त्याचे घर पाडून टाकतात. त्याची पत्नी गरोदर असते तिला खायला अन्न नाही. शेवटी त्याच्या पोटातल्या पोराचा या

संघर्षात अंत होतो. बबन या कारणांनी मुंबईला शिव्या घालतो. एकंदर मुंबई हे शहर एवढे मोठे असू नये सामान्य माणसाला काहीच किंमत राहत नाही हे हे सांगण्याचा प्रयत्न येथे झालेला आहे.

**३.४ .४.४ इतर :-**

'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकात निवेदक, डॉक्टर, गृहस्थ, मुन्ना, गुंड, हवालदार, नाडकर्णी कशाळकर, स्त्री, पुरुष अशी अनेक इतर पत्रे या नाटकातून आलेले आहे.

**३.५ 'माझं घर' : महानगरीय जाणीवा व समाजवास्तवाचे चित्रण**

लेखक जयंत पवार यांनी माझं घर ह्या नाटकातून एका स्त्रीच्या वाट्याला आलेल्या दुःखाची कहाणी सांगितली आहे.

**३.५ .१ परिचय**

'माझं घर' हे नाटक जयंत पवारांनी १९९७ मध्ये अधांतर हे नाटक रंगमंचावर आल्यानंतर लिहायला घेतलं. हे नाटक एक वेगळे नाटक आहे. ह्या नाटकाचा केंद्रस्थानी 'स्त्री' आहे. स्त्रीचा घराशी असलेला जैविक संबंध त्यांनी या नाटकाच्या केंद्रस्थानी आणलेला आहे. 'माझं घर' हे नाटक कौटुंबिक आहे. प्रस्तुत नाटक कौटुंबिक समस्या घेऊन वाचकांसमोर येते आणि त्या समस्यांचे उत्तरदेखील देते.

**३.५ .२ माझं घर या नाटकातील व्यक्तिचित्रण**

'माझं घर' या नाटकात विभा ही स्त्री व्यक्तिरेखा केंद्रस्थानी आहे. संपूर्ण नाटक वीभाच्या भोवती फिरताना दिसते.

**३.५ .२.१ विभा :-**

'माझं घर' या नाटकातील विभा ही केंद्रावर्ती व्यक्तिरेखा आहे. विभा ही दिनेशची पत्नी आहे. मुंबईतील अंधेरी या उपनगरात चांगला पॉश लोकॅलिटीतला टू बेडरूम किचनचा फ्लॅटमध्ये ते राहतात. विभा, तिचा नवरा दिनेश, तिची मुलगी आणि सासु अशी त्यांचे कुटुंब आहे. विभा ही नोकरी करत असते.

विभाचे माहेरचे लोक सदैव दुसऱ्यांची मदत करायचे तसेच ते कोणावरही बेदभाव करत नव्हते. त्यामुळे विभाचे बालपण चांगले व सकारात्मक विचाराने गेले. तिचे वडिलांनी आयुष्यभर सामाजिक कार्य

केले होते. विभा ही व्यातिरेखा हुशार असल्याचे दिसून येते. तिचे शिक्षण कॉलेजपर्यंत झाले. त्याचबरोबर ती सतार खूप छान वाजवायची आणि गाणेही म्हणायची. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये तिला दोन वेळी विजयी प्राप्त झाली होती. हे सगळे तिचे छंद होते. हे सगळे तिच्या भावाच्या बोलण्यावरून समजून येते. विभा ही आजची स्त्री ज्याप्रमाणे नोकरी करते व नोकरी सोबत घरकाम सांभाळने अशी विभा ही व्यातीरेखा या नाटकातून लेखक जयंत पवार यांनी रेखाटलेली आहे.

विभा ही या नाटकातील अशी व्यतिरेखा आहे जी सर्वांच्या मनात आपली जागा निर्माण करते. त्याचबरबरीने तिच्या जागी आलेली दुःख सर्व वाचकांचा मनाला भोंभावून टाकणारी आहे. विभा नोकरी करणारी महिला आहे. नोकरी करत असताना तिला घराचे देखील काम करावे लागते..ती सकाळी उठून चहा नाश्ता करते व कामाला जाते. संध्याकाळी परत घरी येऊन जेवण, भांडी धुणे वगैरे सर्व कामे अगदी मनापासून करते. तिला कधीही राग, अहंकार वगैरे असलेला नाटकातून दाखवला नाही.

ती घरच्या कामासोबत आपल्या मुलीच्या शिक्षणाची काळजी घेते व शाळेत मीटिंग असली तर विभा स्वतः रजा घ्यायची. कारण दिनेश कधीच तिच्या शाळेत जात नव्हता. मुलीबरोबर सासुची तब्येतिची काळजी विभा घेताना दिसते. विभा ही एकंदर खुप कष्टाळू व सर्वांना जपून ठेवणारी अशी व्यक्तीरेखा लेखकाने या नाटकातून चित्रित केली आहे.

**३.५. २.२ उर्मिला:-**

उर्मिला ही विभाची नणंद आणि दिनेशची बहीण असते. उर्मिला ही विभाची चांगली मैत्रीण सारखी असते. त्यांचे दोघांचे एकमेकांशी असलेले संबंध अगदी जवळीक मैत्रीसारखी आहे. उर्मिलाने एसएससी शिक्षण पूर्ण केले व नोकरीसाठी मुंबई सोडून कोल्हापूरला जायचे ठरवते.परंतु हा तिचा निर्णय दिनेश आणि आईला पटत नाही. ते तिला विरोध करतात. मात्र विभा ही ठान पणे उर्मिलाचा पाठीशी भक्कमपणे उभी राहते. व शेवटी ती कोल्हापूरला नोकरीसाठी जाते.

दिनेश जेव्हा विभाला घटस्फोट द्यायचा ठरवतो तेव्हा उर्मिलाला खूप वाईट, दुःख होते. ती भावाला खुप समजवायचा प्रयत्न करते परंतु तो काही ऐकत घायचा मनस्थितीत नसतो. दिनेशचे लग्न झाल्यानंतर

नंदिताला पोटात ट्यूमर होतो, तेव्हा घरातले कोणतीही व्यक्ती जायला तयार होत नाही.पण ऊर्मिला मात्र जाते. यावरून असे लक्षात येते की काहीही झाले तरी आपल्या स्वतःच्या भावाच्या दुःखाच्या वेळी बहीण सगळे काही विसरुन भावाच्या मदतीसाठी धावत असते. यावरून बहीण आणि भाऊ यांचा संबंध दिसून येतो.

उर्मिलाचे लग्न झालेले नसले. तिचे लग्नाविषयी मत वाईट आहे. तिच्या मते पुरुषप्रधान व्यवस्थेत विवाहसंख्या हि स्त्रियांच्या हिताची नाही. तिचा लग्नावर विश्वास नाही हे तिच्या बोलण्यातून कळते "माझ्या लग्नविषयात विश्र्वास नाही. कारण पण तुम्ही लग्न करणारी माणसं ह्या, सिरीयस गोष्टीचा चुथडा करून टाकतो". पवार जयंत माझं घर, सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, प्र. आ २०२२ pg ३६

### ३.५ .२.३ दिनेश:-

दिनेश हा विभाचा नवरा असतो. दिनेश हा जाहिरात कंपनी चालवतो. त्याला चित्रकलेची फार आवड आहे. तो अधूनमधून चित्रे काढत असायचा. नवरा बायको दोघेही काम करत असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याचे दिसून येते. दिनेश आणि विभाच्या लग्नाला दहा वर्षे झाली होती आणि दिनेश गेल्या सहा महिन्यांपासून त्याच्या कंपनीतल्या नंदिता नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो. दिनेश सतत विभावर ओरडत, चिडचिड, तिचा अपमान करत असतो.

### ३.५ .२.४ इतर व्यक्तिरेखा

माझं घर या नाटकात विभा, दिनेश, उर्मिला हे पात्र आहेत या व्यतिरिक्त विभाचा भाऊ मधु, तिची मुलगी राणी, विभाची आई मालती सावळी आणी नंदिता मुर्डेश्र्वर ही इतर किंवा दृथम व्यक्तिरेखा आहेत.

राणी ही विभाची मुलगी आहे. राणी ही आठ-दहा वर्षाची आहे आणि ती शाळेत जाते. राणीला जेव्हा आई-वडिलांचा विभक्त होण्याचा निर्णय कळतो तेव्हा तिला धक्का बसतो. तिला तिच्या आई-बाबांना वेगळं होताना बघायचे नसते. ती घटस्फोटानंतर आईकडेन राहते, मात्र तिला तिच्या वडिलांचा सहवास हवाहवासा वाटत असतो. राणी तिच्या शाळेतल्या मुलांच्या माध्यमातून वडिलांचा पत्ता शोधण्याचा प्रयत्न करते. नंदिता व दिनेश तिला भेटायला शाळेत आले होते व तिला कलर्स दिले होते तेव्हा राणीने विभाला हे सत्य सांगितले नाही. तिने शाळेत एका मुलाचा वाढदिवस होता आणि त्याने ते दिले असे खोटं सांगितले होते.

### ३.६ समारोप

'जयंत पवारांच्या नाटकातील महानगरीय संवेदना व बदलत्या समाजवास्तवाचे चित्रण' या प्रकरणाच्या पूर्वार्धात महानगरीय साहित्य म्हणजे काय याचा थोडक्यात विवेचन केले आहे. महानगरीय संवेदना व महानगरीय समाजजीवनाची वैशिष्ट्ये समजून घेतली. संपूर्ण विवेचनावरून जयंत पवार यांनी त्यांच्या नाटकातून महानगरीय जाणीवा आणि त्यातून दिसून येणारे समाजवास्तवाचे चित्रण कशाप्रकारे झाले आहे याचा एकुण आढावा या प्रकरणात घेतलेला आहे. औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक प्रगती झपाट्याने वाढल्यामुळे महानगरे उभी राहिली आणि त्याचे चित्रण अगदी बारकाईने जयंत पवारांनी त्यांच्या नाटकातून चित्रित केले आहे.

### ३.७ निष्कर्ष

१. जयंत पवारांच्या नाटकातून महानगरीय संवेदना दिसून येतात.

२. महानगरीय संस्कृतीत भाषा, समाजव्यवस्था यांचा संमिश्रपणा जाणवतो.

३. महानगरीय संस्कृतीत वेगवेगळ्या जातीतील किंवा धर्माचे लोक दिसून येतात.

४. औद्योगिक क्रांती आणि जागतिकीकरणाने महानगरे उभी राहिली.

५. महानगरात प्रचंड गर्दी असूनही माणसाला एकटेपणाची जाणीव भासत असते.

६. मुंबईसारख्या महानगरात गर्दी असून देखील एकाकीपणा, अस्वस्थ, असुरक्षित अशा अनेक समस्या त्यांच्यावर असतात.

७. जयंत पवारांनी महानगरीय वास्तव आपल्या नाटकात पकडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहेत.

८. जयंत पवारांनी महानगरातील माणसांच्या जगण्याची विविधता अधोरेखित केलेली आहेत.

**संदर्भ**

---

[i] एम ए मराठी. *महानगरीय साहित्य,* युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, प्रकाशक: संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ. पृष्ठ क्रमांक १३.

---

[ii] एम ए मराठी. *महानगरीय साहित्य*, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, प्रकाशक: संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ. पृष्ठ क्रमांक १३.

# प्रकरण ४

# जयंत पवार यांच्या नाटकातील भाषाशैली


**प्रास्ताविक** .......... 51

**४.१ ‘नाटक’ वाङ्मयप्रकाराची भाषा आणि संवाद** .......... 51

**४.२ जयंत पवारांच्या नाटकातील संवाद** .......... 52

**४.३  काय डेंजर वारा सुटलाय नाटकाची भाषाशैली** .......... 52

**४.४ अधांतर नाटकाची भाषाशैली** .......... 54

**४.५ माझं घर** .......... 55

**४.६ समारोप** .......... 56

**४.७ निष्कर्ष** .......... 56

**संदर्भ सूची** .......... 57

# प्रकरण ४

# जयंत पवार यांच्या नाटकातील भाषाशैली

## प्रास्ताविक

नाटक हा साहित्यप्रकार दृक-श्राव्य आहे. सर्वांना आवडणारा असा हा प्रकार आहे. अनेक नाटककारांनी हा वाङ्मयप्रकार हाताळून त्यातून अनेक नाटक निर्माण केली आहेत. वाङ्मयदृष्टीने अनेक नाटककारांची नाटके कसरदार बनली परंतु प्रायोगिकदृष्ट्या बरीचशी अपयशी ठरली. अत्रे, कानेटकर यांनीही नाटके लिहिली. त्यांच्या नाटकांना वाङ्मयीन मुल्ये होती; परंतु प्रायोगिक यश त्यांना मात्र प्राप्त झाले नाही. साधारणतः १९६० नंतर प्रायोगिकदृष्ट्याचे भाग्य चि. त्र्यं. खानोलकर, विजय तेंडुलकर, अच्युत वझे, जयंत पवार यांच्या नाटकातून आलेले आहे. त्यांची नाटके वाङ्मयीन दृष्ट्या बरोबरच प्रायोगिकदृष्ट्याही असलेली दिसून येतात.

भाषा हा ललित वाङ्मयप्रकाराचा महत्त्वाचा घटक आहे. नाटकातली भाषा ही इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळी असते. नाटकात संवादाला फार महत्त्व असते. तसेच संवाद हा नाटकाचा आत्मा मानला जातो.

प्रस्तुत प्रकरणात नाटकाच्या भाषेचा अभ्यास केला जाणार आहे. जयंत पवार यांच्या 'अधांतर', 'काय डेंजर वारा सुटलाय' आणि 'माझं घर' या नाटकांचा भाषेचा अभ्यास या प्रकरणाद्वारे केला जाणार आहे. त्यांनी नाटकात कशाप्रकारे भाषेचा वापर केलेला आहे आणि महानगरात राहणाऱ्या लोकांच्या भाषेचा परिणाम त्यांच्या नाटकातून आलेला आहे का? याचा शोध या प्रकरणात केला जाणार आहे.

### ४.१ 'नाटक' वाङ्मयप्रकाराची भाषा आणि संवाद

भाषा हा ललित वाङ्मयप्रकाराचा महत्त्वाचा घटक आहे. भाषेमुळे साहित्याला एक वेगळे रूप प्राप्त होते. नाटकातील भाषा ही इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळी असते. नाटकातील भाषा ही पात्रांना अनुसरून येत असते. माणुस जी भाषा बोलतो, ज्या परिसरात राहतो त्यावरून त्याची संस्कृती आणि स्वभाव दिसून येतो.

“नेहमीच्या व्यवहारातील भाषा नाटकात वापरली तर ती कंटाळवाणी होईल. नाटक कितीही वास्तववादी असो परंतु कोणत्याही उच्च दर्जाच्या नाटकात अशी व्यवहारवादी भाषा आढळणार नाही” असे वरेरकर म्हणतात. त्यांनी पुढे म्हटले आहे की, “वास्तववादी नाटककारांनी मोठ्या अहंमहिकेने आपण व्यवहारात बोलतो तसेच संवाद वास्तवाच्या भरात नाटकात आणण्याचा प्रयत्न केला तर ते किती कंटाळवाणे व निर्जीव वाटतात हे सहज लक्षात येते”.[1] भाषेमुळे एखादे साहित्य विशिष्ट प्रदेशाचे आहे हे लक्षात येते. जेव्हा एखादा साहित्य वाचतो तेव्हा त्या साहित्यातील भाषाशैलीमुळेच तेथील समाजजीवन वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहते. पात्रांच्या तोंडून येणारे शब्द त्या प्रदेशातील संस्कृती, श्रद्धा, परंपरा, जाणिवा चित्रित करते. त्यामुळे भाषा ही साहित्यात अतिशय महत्त्वाची असते. भाषा ही काळानुसार बदलत जाते. **र. बा. मंचरकर** भाषेच्या परिवर्तनाबाबत म्हणतात की “काळ, सामाजिक वर्ग, व्यवसाय, राजकीय विभाजन, भौगोलिक अंतर यामुळे एकभाषिक समाज विभागला गेला की भाषेत अनेकविधता येते”.[2]

### ४.२ जयंत पवारांच्या नाटकातील संवाद

संवाद हा नाटकाचा आत्मा असतो. संवादाला नाटकात एक अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. नाटकात नाटककार काय सांगतो हे जसे महत्वाचे आहे तसेच तो कशाप्रकारे सांगतो हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. कथानिवेदनाचे व स्वभावरेखाटनाचे काम नाटककार संवादाद्वारे करत असतो. नाटकात संवाद हा कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय मांडण्याचे काम करते.

### ४.३ काय डेंजर वारा सुटलाय नाटकाची भाषाशैली

‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकातील संवाद हे या नाटकाचे अत्यंत महत्त्वाचे बलस्थान आहे. जयंत पवारांनी या नाटकाला एक वास्तवदर्शी स्वरूप दिले आहे. ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकाची सुरुवातच इंग्रजी संवादातून झालेली आहे. मेघा इव्हेंट्स अँकरिंग करताना इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषेचा वापर करून नाटककार जयंत पवार यांनी या नाटकाची मांडणी केली आहे. या संपूर्ण नाटकात हिंदी भाषेचा वापर बेसुमार झालेला आहे. नाटककाराने या नाटकात आधुनिकता तसेच नवे फॉर्म या नाटकाला दिलेले आहे. या नाटकातून मराठी भाषा ही हरवल्यासारखी वाटते. मूळ मराठी भाषा नष्ट होत चालली आहे हे ह्या नाटकातून दिसून येते.

संवादामुळे नाटकाचे कथानक प्रेक्षकांसमोर उलगडत जाते. ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकातील संवाद सरळ, सहज, साधे, सोपे बोलीभाषेत आहे. या नाटकाच्या सुरुवातीच्या प्रसंगात महानगरातील श्रीमंत माणसांचे शाबासकीची सोहळा सुरू आहेत. या नाटकात नाटककाराने फ्लॅशबॅक तंत्रांचा वापर केलेला आहे. जयंत पवारांनी कवितांचा वापर अतिशय खुबीने केलेला आहे.

कवितेचे उदाहरणार्थ :-

**१.**
**साहेबाची खिडकी फुटली**
**गादीवर काचा काचा**
**मास्तर बघा कसा**
**हिसडे मारतो भिंतीवरती भारताचा नकाशा**
**गेला उडत खिडकीबाहेर**
**डोंगरासकट नद्यांसकट खुंटीसकट**
**गेला उडत आकाशात**
**काय डेंजर वारा सुटलाय**
**काय डेंजर वारा सुटलाय....**

**२.**
**अरे तुझी टोपी...**
**तुझी टोपी गेली खड्ड्यात**
**कपाळ पहिलं सांभाळ**
**काय डेंजर वारा सुटलाय**
**डोसक्यात कचरा... धूळ धूळ डोळ्यांत**
**साहेबाची खिडकी फुटली**
**गादीवर काचाकाचा**
**आपोआप गुंडाळतोय पंजाब्याचा गालिचा**
**पार्शिणीचा फ्लॉवरपॉट गडबडा लोळतोय**
**काय डेंजर वारा सुटलाय**

या नाटकांमध्ये बऱ्याच प्रमाणात इंग्रजी शब्दांचा वापर झालेला आहे. उदाहरणार्थ:- क्लब, बेड, अवॉर्ड, फेडाऊट, फ्लॅट, बाथरुम, इंटेरियर आदि.

**४.४ अधांतर नाटकाची भाषाशैली**

'अधांतर' हे नाटक मुंबई येथील लालबाग परळ या परिसराचे असून त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेचा वापर झालेला आहे. नाटककार जयंत पवार यांनी अधांतर या नाटकातून महानगरीय समाज वास्तवाचे चित्रण करताना त्या परिसरात असणाऱ्या लोकांची भाषा वापरली आहे. महानगरात माणसे इतर भागातून आलेले असल्यामुळे त्यांच्या भाषेचा वापर देखील या नाटकातून आलेला आहे.

या नाटकातील आई म्हणजेच लक्ष्मी दूरी यांच्या तोंडी मालवणी बोली भाषेचा वापर आलेला आहे. आई मुलांशी बोलताना किंवा इतर कोणाशी बोलताना केवळ मालवणी बोली भाषेचा वापर करते.

**उदाहरणार्थ:-**

**आई: चुकले बाय, परत अवाक्षर नाय काढणार. त्यांना म्हणावा तुम्ही मोप संप करा. उपोषणा करा. युनियन फिनियन सगळा करा. स्वतःच्या जीवाचे हाल करा, बायकोचे हाल करा, पण एकदाची मिल सुरू झाली की शिदा कामावर जा. परत बावटे हालवत फिरू नका. हे एवढा पाणी ओत जा मोरीत.**[3]

नाटकाची भाषा हे नाटकाचे खास वैशिष्ट्य आहे. 'अधांतर' नाटकात येणारी भाषा, संवाद हा नाट्य आशयाचा महत्त्वाचा भाग आहे. भेंचोद, भोसडीचा इत्यादी शिव्या संवादातून आलेल्या आहेत. उदाहरणार्थ-

**नरू: मं सोडतो काय, कम्पलेण करतो भोसडीचा**[4]**.**
**नरू: देतो म्हणून मागतो. हे आयतखाव भेंचोद तेवढे तरी देतात काय?**[5]

नाटकात शिव्यांचा वापर झाला असला तरी कुठेच नाटक अश्लील वाटत नाही. कारण मुंबई हे महानगर असल्याने तिथे अनेक प्रकारचे माणसे राहतात. या शहरात गुंडे, मवाली लोक असल्याने तिथे सहज शिव्यांचा वापर केला जातो. जयंत पवारांनी त्या शहराचे प्रत्यक्ष दर्शन उभे करण्यासाठी त्यांनी अशा भाषेचा वापर केलेला आहे. त्यांनी महानगरीय समाजजीवन मांडताना महानगरात लोक जी भाषा बोलतो ती प्रत्यक्ष भाषा त्यांनी त्यांच्या नाटकातून वास्तवपणे मांडलेली आहे. नाटककार जयंत पवार यांचे अधांतर हे नाटक भाषेमुळे अधिक प्रभावीत झालेले आहे. त्यामुळे त्यांनी जो भाषेचा प्रयोग केला आहे त्यातून त्यांची प्रयोगमुल्ये दिसून येतात.

जयंत पवारांनी त्यांच्या नाटकातून इंग्रजी भाषेचा वापर केलेला आहे. त्यांच्या तिन्ही नाटकातून इंग्रजी भाषेचा वापर झालेला आहे. 'अधांतर' या नाटकात 'बाबा' हा साहित्य विषयी प्रेम असणारा आहे. त्यामुळे त्याच्या तोंडून इंग्रजी भाषेचा वापर झालेला आहे. उदाहरणार्थ-

**बाबा: व्हॉट डू यु मिन बाय फ्रस्ट्रेशन? फ्रस्ट्रेशन मधला 'फ' तरी माहिती आहे?**[6]
**बाबा: हे बघ, बेसिकली आय ॲम अ क्रिएटर.**
**बाबा: तुम्हाला त्रास होतो. अडचण होते माझी. आय नो इट व्हेरी वेल.**

अधांतर हे नाटक गिरणी कामगारांच्या भयाण जीवनाभुवांचे चित्रण करणारे नाटक आहे. नाटकात ग्रामीण भाषेचा वापर झालेला आहे. उदाहरणार्थः- बेशरम्या, मेल्या, म्हशा आदि शब्दांचा वापरवकेलेला आहे. त्याचप्रमाणे अनेक ग्रामीण भाषेतून शिवीगाळ साठी मादरचोत, भडव्यांनो, भेंचोद, भोसडीच्या सारखे शब्दांचा वापर झालेला आहे.

### ४.५ माझं घर

'माझं घर' या नाटकाची अत्यंत साधी सरळ मराठी भाषा आहे. अगदी सर्वसामान्य माणसाला समजेल अशी भाषेची रचना नाटककार जयंत पवार यांनी वापरलेली  केलेली आहेत. जयंत पवार यांनी या नाटकातून स्त्रीला हिंदुस्थानी ठेवून स्त्रीचा घराशी असलेला जैविक संबंध या नाटकातून मांडलेला आहे. हा विषय मांडताना त्यांनी एक सर्वसामान्य समाजातील स्त्रीच्या तोंडून बोलणारी भाषेचा वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे बोलीभाषेचाही वापर झालेला आहे.

विविध जमतीतील लोक मुंबई या शहरात वास्तवास आहे. महानगर असल्याने ह्या नाटकातून हिंदी मराठी मेसेज भाषेचा वापर आलेला आहे.  विभा दूधवाल्याशी संवाद साधताना हिंदी भाषेचा वापर केलेला आहे. नाटकाच्या तिसऱ्या प्रवेशात दूधवाला विभाच्या घरी येतो व बेल वाजवतो व विभा दरवाजा उघडते तेव्हा हिंदी भाषेत त्यांचे दोघांचे संवाद आलेले आहे.

**विभा: दूध तो सुबे दिया ना...**
**दूधवाला: बील. आप दोपहरको आने को बोले थे...**
**विभा: कितना है?**
**दूधवाला: पाचोसो अस्सी.**
**विभा: कैसे? चार खाडा पकडा?**

**दूधवाला: हां**
**विभा: मे चेक करती हूं.**

हिंदी भाषेचा केवळ बाहेरच्या माणसांशी बोलताना वापर केलेला आहे. जयंत पवारांनी त्यांच्या नाटकातून इंग्रजी भाषा, हिंदी भाषा, त्यातून आधुनिकता, नवा फॉर्म, मॉडर्निटी साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या नाटकात 'मुंबई' शहर केंद्रस्थानी असल्याने तिथे विविध जाती, धर्माचे लोक आढळतात. विविध लोक काम करून पैसे मिळवण्यासाठी या शहरात येतात त्यामुळे महानगरात हिंदी मिश्रित मराठी भाषेचा वापर जास्त प्रमाणात दिसून येतो.

नाटकातील संवाद नाट्यांतर्गत संघर्षाला अनुकूल असल्याचे, त्याचप्रमाणे पात्रांच्या भावनिक ताणांशी जुळलेले असल्याचे दिसून येते. त्यांच्या नाटकाची शैली ही महानगरीय माणसांचे मानसविश्व चित्रित करणारी आहे.

**४.६ समारोप**

प्रस्तुत प्रकरणात जयंत पवारांच्या नाटकातील भाषा या अनुषंगाने चर्चा केली आहे. जयंत पवारांनी त्यांच्या नाटकातून हिंदी मिश्रित मराठी भाषेचा वापर केलेला आहे. महानगरीय शहर केंद्रित असल्याने त्यात विविध प्रकारचे लोक समुहाने राहतात त्यामुळे त्या परिसरात अनेक भाषांचा वापर त्यांच्या नाटकातून आलेला आहे. त्यांच्या तिन्ही नाटकातून इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेचा वापर झालेला आहे. हे त्यांचा नाटकाचे साम्य आहे. अधांतर या नाटकात ग्रामीण भाषेचा वापर झालेला आहे. काय डेंजर वारा सुटलाय या नाटकात नाटककाराने कविता वापरून या नाटकात वेगळा प्रयोग केलेला आहे. ज्यातून त्यांची प्रयोगमूल्ये दिसून आली. माझं घर या नाटकातून आधुनिक माणसांच्या तोंडून येणारी भाषेचा वापर नाटककाराने केलेला आहे.

**४.७ निष्कर्ष**

१) जयंत पवारांच्या अधांतर, काय डेंजर वारा सुटलाय आणि माझं घर या तीनही नाटकात इंग्रजी भाषेचा वापर केला आहे.

२) काय डेंजर वारा सुटला या नाटकात बेसुमार इंग्रजी भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे इंग्रजी मिश्रित मराठी भाषा आली आहे. त्यात संवादाचे मराठीपण हरवल्यासारखे वाटते.

३) संवाद हा नाटकाचा महत्वाचा घटक असतो. संवादातच नाटकाचे यश सामावलेले असते.

४) अधांतर नाटकातून शिव्या आलेला आहे परंतु नाटक कुठेही अश्लील बनलेले नाही.

५) 'माझं घर' या नाटकातून आधुनिक स्त्रीच्या तोंडून येणारी भाषा दिसून येते.

६) काय डेंजर वारा सुटलाय या नाटकात मुंबई महानगरात ऐकायला मिळणाऱ्या भाषेचा वापर झालेला आहे.

७) जयंत पवारांच्या नाटकातून खास मुंबई शहराचा भाषेचा वापर झालेला आहे.

**संदर्भ सूची**

---

[1] कुलकर्णी आरत. मोतेवार, रेखा. *'नाट्यावलोकन'*. सचिन जगदीश उपाध्याय विजय प्रकाशन हनुमान गल्ली, सीताबर्डी नागपूर. प्र.आ २०१८. पृष्ठ क्रमांक १०

[2] पावडे, व्यंकटी. *रा. रं.बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा,* दत्ता डांगे, 'कांचनब्रह्म', इसाप प्रकाशन,१९० सहयोगनगर, नांदेड. प्रथामावृती १५ ऑगस्ट २०१३ पृष्ठ क्र. १९३.

[3] पवार, जयंत. *'अधांतर'*, रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.३५ सी, पं. मालवीय मार्ग ताडदेव, मुंबई.१९९९. पृष्ठ क्र ४.

[4] पवार, जयंत. *'अधांतर'*, रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.३५ सी, पं. मालवीय मार्ग ताडदेव,मुंबई.१९९९ पृ. ३०

[5] पवार, जयंत. '*अधांतर*', रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.३५ सी, पं. मालवीय मार्ग ताडदेव,मुंबई.१९९९,पृ.३०

[6] पवार, जयंत. '*अधांतर*', रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.३५ सी, पं. मालवीय मार्ग ताडदेव,मुंबई.१९९९ पृष्ठ क्र. ३७.

# प्रकरण ५

# निष्कर्ष

## प्रास्ताविक

'जयंत पवार यांच्या नाट्यकृतींचा अभ्यास' या विषयांतर्गत मागील चार प्रकरणातून मराठी नाटककाचे स्वरूप, मराठी नाटकाची वाटचाल तसेच मराठी नाटकाची संकल्पना, घटक अशा विविध घटकांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली आहे. तसेच नव्वदोत्तरी मराठी नाटक आणि जयंत पवारांनी लिहिलेली नाटके आणि नव्वदोत्तरी काळात त्यांनी मराठी नाटकात कशाप्रकारे योगदान दिलेले आहे या बाबींचा अभ्यास केलेला आहे.

जयंत पवारांच्या नाटकातील महानगरीय संवेदना बदलते समाजवास्तव, त्यांच्या नाटकातील भाषेचा प्रस्तुत ठिकाणी अभ्यास करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष क्रमवार मांडलेले आहेत.

### निष्कर्ष

१. आजच्या भारतीय नाटक आणि रंगभूमीला अत्यंत प्राचीन अशी परंपरा लाभलेली आहे.

२. प्रारंभी मानवाने आपल्या मनोरंजनासाठी ललित कलांचे विश्व निर्माण केले.

३. नाटक हा रंगभूमीवर सादर होणारा व एकत्रितपणे समूहाने पाहता येवू शकेल असा दृक-श्राव्य साहित्यप्रकार आहे.

४. भरतमुनींना भारतीय नाट्यशास्त्राचे जनक मानले जाते.

५. भरतमुनींच्या नाटकाच्या व्याख्येवरून त्यांनी रसांना म्हणजेच भावनांना महत्त्व दिलेले आहे हे स्पष्ट होते.

६. विष्णुदास भावे यांचे 'सीता स्वयंवर' म्हणजे मराठी नाट्ययुगाचा आरंभबिंदू होय.

७. इ.स १९६० च्या दरम्यान प्रयोगिक नाटक, प्रयोगीक रंगभूमी असे शब्दप्रयोग वापरात येऊ लागले.

८. इ.स. १९९० नंतरच्या नाटकाच्या आशयात विषय नाविन्य हे वेगळे प्रयोग या काळाचे वैशिष्ट आहे.

९. इ. स. १९९० नंतर जागतिकीकरणाच्या आगमनाने बदललेला सामाजिक आणि सांस्कृतिक अवकाश, बदललेला समाज, वृत्ती – प्रवृत्ती, नातेसंबंध, चंगळवाद , एकाकीपणा अशा विविध प्रश्नांची चर्चा वेगळा अंगाने या काळातील नाटकातून आविष्कृत होताना दिसते.

१०. नव्वदोत्तरी कालखंडातील नाटककारांनी नाट्यलेखनात वेगवेगळे प्रयोग करून जागतिकीकरणाचा प्रभाव त्यांच्या नाट्य आशयातून अधोरेखित केलेला आहे.

११. नव्वदोत्तरी मराठी नाटकातून समाजातील अनेक घटना, प्रश्न मांडलेले गेलेले आहेत.

१२. जयंत पवारांच्या नाटकातून महानगर केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.

१३. जयंत पवार यांनी त्यांच्या नाटकातून महानगरातील वास्तव मांडून या कालखंडातील नाटकात आपले एक वेगळे स्थान प्राप्त केले आहे.

१४. जयंत पवारांनी अतिशय अंतर्मुख करायला लावणारे असे लेखन केले आहे.

१५. इ.स. १९९० नंतरच्या नाटकात जयंत पवारांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.

१६. जयंत पवारांनी नाटकातून महानगरीचे धावपळीचे जीवन महानगराचे प्रश्न, मध्यमवर्गीय कुटुंबाची झालेली परिस्थिती अशा अनेक विषयांना प्राधान्य दिलेले आहे.

१७. जयंत पवारांच्या नाटकातून माणसातील तुटलेपणा दिसून येतो.

१८. जयंत पवारांच्या 'अधांतर', 'काय डेंजर वारा सुटलाय' आणि 'माझं घर' या तीनही नाटकात इंग्रजी भाषेचा वापर झालेला आहे.

१९. जयंत पवारांनी 'अधांतर' नाटकाच्या माध्यमातून मुंबईतील कापड, गिरण्या बंद पडल्यामुळे कामगारांच्या कुटुंबावर झालेल्या परिस्थितीचे चित्रण केलेले आहे.

२०. जीवनाची त्रिशंकू अवस्था, त्या पात्रांचे जीवन, जीवन जगताना जीवनाचा अर्थ न समजणे हे सर्व घटक अधांतर या नाटकातून दिसून येतात.

२१. आपल्या नवऱ्याच्या निधनानंतर आपल्या संसाराचा गाढा एकटीने ओढतानाची एक सोशिक स्त्री आई या नाटकाची केंद्रबिंदु असलेली दिसते.

२२. या नाटकातून मुंबई शहरात वावरणारी स्त्रीच्या अनेक रूपांचे दर्शन घडते.

२३. ‘अधांतर’ या नाटकातून माणसामाणसामधील ताण- तणाव, गुंता गुंती, कौटुंबिक व्यवस्था, नात्यातील दुरावा या सर्वांचे प्रत्यय दिसून येतात.

२४. ‘अधांतर’ नाटकातून स्वार्थी व आत्मकेंद्रित जगाचे वास्तव दिसून येते.

२५. ‘अधांतर’ नाटकात ग्रामीण भाषेचा वापर झालेला दिसून येतो.

२६. ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकात बेसुमार इंग्रजी भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे इंग्रजी मिश्रित मराठी भाषा आली आहे. त्यात संवादाचे मराठीपण हरवल्यासारखे वाटते.

२७. जयंत पवारांनी ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकातून माणसांची चंगळवादी संस्कृतीचे दर्शन घडवले आहे.

२८. उच्चवर्गीय माणूस व मध्यमवर्गीय माणूस या दोघांची जगण्याची पद्धत कशी वेगळी आहे याचे चित्रण या नाटकातून चित्रित केले आहे.

२९. ‘काय डेंजर वारा सुटलाय’ या नाटकात मुंबई महानगरात ऐकायला मिळणारी भाषेचा वापर झालेला आहे.

३०. ‘माझं घर’ स्त्रीमनाचे प्रतिबिंब दाखवणारे नाटक आहे.

३१. ‘माझं घर’ या नाटकातून आधुनिक स्त्रीच्या तोंडून येणारी भाषा दिसून येते.

३२. ‘माझं घर’ हे कौटुंबिक समस्यांवर प्रकाश टाकणारे नाटक आहे.

३३. स्त्रीचा घराशी असलेला जैविक संबंधाचे चित्रण माझं घर या नाटकातून दिसून येते.

३४. जयंत पवारांच्या नाटकातून खास मुंबई शहरातील भाषेचा वापर झालेला जाणवतो.

३५. जयंत पवारांनी अतिशय सूक्ष्म पद्धतीने भाषेचा वापर त्यांच्या नाटकात केलेला आहे.

३६. उत्कृष्ट संवाद लेखनामुळे त्यांच्या नाटकातील पात्रे जीवंत वाटतात.

# परिशिष्टे

परिशिष्ट क्र.१: ....................................................................................................62

जयंत पवार ह्यांचे छायाचित्र ....................................................................................62

परिशिष्ट क्र.२: ....................................................................................................62

जयंत पवारांच्या जाण्याने संवेदनशील लेखक ,नाटककार गमावला ;मुख्यमंत्र्यांनी ,उपमुख्यमंत्र्यांनी वाहिली श्रद्धांजली. ....................................................................................62

परिशिष्ट क्र३.- जयंत पवार जीवन परिचय ....................................................................63

परिशिष्ट क्र.४- प्रकाशित ग्रंथसंपदा ............................................................................64

परिशिष्ट क्र.५- अधांतर नाटकाचे मागचे छायाचित्रे ......................................................65

परिशिष्ट क्र.६- अधांतर स्टेजचे समोरचे छायाचित्रे.......................................................65

परिशिष्ट क्र.७- अधांतर पुस्तकाचे मुखपृष्ठ ...................................................................66

परिशिष्ट क्र.८- काय डेंजर वारा सुटलाय पुस्तकाचे .......................................................66

परिशिष्ट क्र९ टेंगशेंच्या स्वप्नात ट्रेन पुस्तकाचे मुखपृष्ठ. ...............................................67

परिशिष्ट क्र.१०- माझं घर पुस्तकाचे मुखपृष्ठ.................................................................67

परिशिष्ट क्र. ११ जयंत पवार यांची लीना केदारे यांनी घेतलेली मुलाखत ......................68

# परिशिष्टे

**परिशिष्ट क्र.१:**

**जयंत पवार ह्यांचे छायाचित्र**



**परिशिष्ट क्र२.:**

**जयंत पवारांच्या जाण्याने संवेदनशील लेखकउपमुख्यमंत्र्यांनी ,मुख्यमंत्र्यांनी ;नाटककार गमावला , .वाहिली श्रद्धांजली**




# परिशिष्ट क्र.३- जयंत पवार जीवन परिचय

१. **नाव :- जयंत पवार**

२. **जन्मदिनांक:-१९६०**

३. **व्यवसाय:- नाट्यसमीक्षक**


४. **पत्ता:- लालभाग परळ**



**परिशिष्ट क्र.४- प्रकाशित ग्रंथसंपदा**

| ७.१: कथासंग्रह | ७.२ : एकांकिका संग्रह | **७.३ नाटके** | ७.४: भाषांतरीत साहित्य |
|---|---|---|---|
| १.फिनिक्सच्या राखेतून उठला मोर | नाद | अधांतर | फिनिक्स की राख से उगा मोर |
| २. वरनभातलोन्चा नि कोन नाय कोंचा | निनाद | काय डेंजर वारा सुटलाय | जयंत पवार की चूनी कहानियां |
| ३. लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी | पडसाद | माझं घर | बहुजन संस्कृतीवाद आणि लेखक |
| २. मोरी नींद नसानी होय | | वंश/ पाऊलखुणा | |
| | | लिअरने जगावं की मरावं? | |


परिशिष्ट क्र.५- अधांतर नाटकाचे मागचे छायाचित्रे




परिशिष्ट क्र.६- अधांतर स्टेजचे समोरचे छायाचित्रे




## परिशिष्ट क्र.७- अधांतर पुस्तकाचे मुखपृष्ठ





## परिशिष्ट क्र८.- काय डेंजर वारा सुटलाय पुस्तकाचे



**परिशिष्ट क्र९ टेंगशेंच्या स्वप्नात ट्रेन पुस्तकाचे मुखपृष्ठ.**




**परिशिष्ट क्र.१०- माझं घर पुस्तकाचे मुखपृष्ठ**



**परिशिष्ट क्र ११ .जयंत पवार यांची लीना केदारे यांनी घेतलेली मुलाखत**

**प्रश्न:** नाट्यलेखनाकडे कधी आणि कसे वळलात, हा प्रवास कसं घडला ?

**जयंत**: मी कामगार विभागातला ( परळ – लालबाग – काळाचौकी इ.) सतराव्या वर्षापासून मी मिलमध्ये नोकरी करत होतो. एकांकिका स्पर्धांचा तो काल होता. या स्पर्धांसाठी मी लिहू लागलो. ‘निनाद’ ही आमची नाट्यसंस्था. त्या काळात प्रेमानंद गज्वी, तुलसी बेहरे हे लेखकही लिहित होते. माझ्या एकांकिकांवर संस्थेमध्ये ज्या चर्चा व्हायच्या त्याने माझा आत्मविश्वास वाढत गेला. बीस वर्षांचा असताना ‘नाटककाराच्या शोधात सहा पात्रे’ हे प्रायोगिक नाटक पाहिले. प्रायोगिक चळवळ ही मध्यमवर्गीयांची, त्यांच्या जाणिवांची चळवळ होती. समाजवादी जाणिवा होत्या परंतु त्या एका टिपीकल धारणेतून आलेल्या होत्या. मी ज्या लोकांत, भागांत वाढलो ते लोक रस्त्यावरचे होते. घरात स्पेस नाही म्हणून बाहेर पडणारे. असा समाज अंगावर येतो. समाज आणि व्यक्ती यांचा एकजिनसीपणा यातून मला मिळाला. ‘छबिलदास चळवळ’ किंवा ‘मध्यमवर्गीय प्रायोगिक चळवळ’ पांढरपेशी चळवळ होती. त्यांचे विषय चाकोरीतले होते. विषय न मिळाल्याने ‘छबिलदास चळवळ’ बंद पडली. अमोल पालेकरांच्या ‘जुलूस’चा अनुभव इतर प्रायोगिक नाटकांनी दिला नाही. सर्व जुलूस निघालाय सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीतून आणि त्यात एक तरुण भटकतोय. तो पुन्हा पुन्हा मारला जातोय आणि एक म्हातारा शोधतोय ही ‘जुलूस’ची थीम. त्यामुळे मी अस्वस्थ झालो. छबिलदासमध्ये हे सापडलं नाही. या ट्रॅपमध्ये (मध्यमवर्गीय) फसलो. त्यामुळे त्या काळात मी ज्या एकांकिका लिहिल्या त्या अशाच मध्यमवर्गीय संवेदनशीलतेच्या होत्या.

**प्रश्न**: तुम्ही जिथे राहात होतात त्या परिसरांचा सांस्कृतिक वातावरणाचा तुमच्या नाटकांवर दिसतो, याविषयी जरा सविस्तर सांगा.

**जयंत**: हा प्रभाव माझ्या आयुष्यातूनच मला मिळाला. या परिसरात मालक कामगार, स्त्री – पुरुष असे अनेक संदर्भ दिसले. मी जे मांडत आलोय त्यात माझं असं काही नाही. माझ्या 'उदाहरण', 'दुजा शोक वाहतो आहे' या एकांकिका पाहिल्यास हे स्पष्ट होत जातं. घरात एक माणूस मरतो आहे. त्यानिमित्त लोक भेटायला येतात. तेव्हा ते स्वतःचेच दुःख उगाळत बसतात. 'वाळवी' वरून 'अधांतर' आलं. या सगळ्या ऑटोबायोग्राफीकल होत्या. स्त्री चळवळ, स्त्री प्रश्न यांकडे मी खूप उशीरा आलो. हे मला माहीत नव्हतं. माझ्या परिसरातील बायका खूप झगडत होत्या. खूप काम करीत होत्या. परंतु प्रश्न म्हणून जाणिवपूर्वक म्हणून मी पाहात नव्हतो.

१९८५ हा माझ्या घडणीचा काळ होता. तेव्हा मी 'घुशी' लिहिलेली. दोन बायका आहेत. झोपडपट्टीत राहणाऱ्या. दोघी जावा. नवरे मेलेत. विधवा बायका. मोठ्या भावाच्या बायकोच्या नावावर झोपडं. धाकटी कमावती पण घर तिच्या नावावर नाही. या ताणातून एकमेकींना त्या छळतात. जशा घुशी एकमेकींवर चिखल उडवत फिरत असतात तशा त्या एकमेकींवर करतात. याच्यामध्ये सेक्स पॉलिटीक्सचा भाग आहे. कॉमन पुरुष येतात. ते घर, ती जमीन एका बाईची आहे. एका जमिनीचा मालकी हक्क आहे. माझ्या घरात माझी आई, बहीण यांच्या जे घरावरून वाद होते. ते त्यात रिफलेक्ट झाले. बाईला काहीतरी जमीन पाहिजे असते. त्यासाठी ती पणाला लावते सर्व. 'घुशी'मध्ये ते आहे. 'वाळवी' पण मी लिहिली. त्यात 'अधांतर' मधली आई आणि काम न करणारी तिची मुलं. घराला वाळवी लागते. पुस्तक वाचायला ग्रंथ काढतो तर

अख्या शेल्फला वाळवी लागलेली दिसते. मुलं म्हणतात की ही वाळवी आत्ता नाही लागली. आई एकटीच साफ करत राहते. ‘अधांतर’च्या बाईबद्दल बोलायचं तर हे मी कुठूनही स्त्री पात्र म्हणून उचलले आणि ठेवले असं नाही. याप्रकारच्या बायका मी बघतं होतो. स्त्री प्रत्रांची जाणीव नाही पण माणूसपणाच्या जाणिवा ठेवून काम करतात. स्त्री म्हणून न बघता व्यवस्था सांभाळायची आहे हे त्यांना माहीत होतं. ‘अधांतर’मध्ये आई कोलमडली तेव्हा मुलाचा शर्ट जाळून टाकते. नरू तुरुंगात आहे. ती उद्या तुरुंगात डब्बा घेऊन जाईल. तो लाडका मुलगा आहे. ‘अधांतर’ मध्ये ती आई तिन्ही मुलांना समान वागवत नाही. डावं उजवं करते. नवऱ्याच्या पॉलिसीतले पैसे देणार नाही असंही म्हणते. चिवटपणाच्या उभं राहण्याच्या जाणिवा त्या बाईत आहेत. कामगार वर्गातला पुरुष खचणारा वाटतो. तो लढाऊ आहे. या सर्व लढ्यात बायका खूप होत्या. ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर’ यात फिनिक्स मिलचं ‘बिटीयाँ मिल’ असं आधी नाव होतं. त्यामध्ये स्त्री कामगार कपातीचा निर्णय घेतला गेला. तेव्हा बायकांनी पहिलं बंड केलं. त्यात डांगे, मिरजकर नव्हते. त्या उत्स्फूर्तपणे घेरावात मॅनेजरला अडकवून ठेवलं. ‘अधांतर’मधल्या आईचा पास्ट म्हणजे ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर’ मध्ये सापडू शकेल. विठाबाई जी आहे त्याच्यामध्ये हा नंतरचा फिनिक्स मिलचा बंदचा काळ ज्याच्यामध्ये डांगेंवरच्या डॉक्युमेंटरी फिल्ममध्ये दिसतंय की शेकडो लोक उभे आहे पावसात छत्री घेऊन डांगे भाषण करतात. कामगारांना चपाती भाजी देण्यासाठी चुली मिलच्या बाहेर मांडल्या. हे ‘अधांतर’ मध्ये मिळतं. स्त्री प्रश्न स्त्री चळवळ वाचून होतो. लग्नानंतर या जाणिवा मला समजल्या.

**प्रश्नः** नात्याच्या पलिकडचा संघर्ष तुमच्या नाटकात दिसतो...

**जयंत:** हो. स्त्री वादाचं मुळ तुमच्या कथेत जाणवतं, नात्याच्या पलिकडचा संघर्ष तुमच्या नाटकात दिसतो 'अधांतर' मधली आई गुंडाला जगवते. 'आमच्या या घरामध्ये' आई मुलाला शेवटी मारते. अविनाश बिनीवाले यांनी ब्रेख्तचे 'मदर करेज' हे नाटक मराठीत आणले. त्या नाटकातील आईची मुलं युद्धात मारली जातात. तिचा एक मुलगा मारला जातो. ती आई त्या मुलाला माझा नाही असं सांगते. आपल्याला जगायचंय म्हणून ती नकार देते. ही जाणीव 'अधांतर'मधल्या आईची आहे. पुरुष एका ठिकाणी शस्त्र टाकतात. अनेक कामगार पुरुष प्रतिगामी. बाई जगते. जाणीव घेऊन वाढत असते. ते तिच्या आतमध्येच आहे. पोलिस लाईनवर फिल्म लिहीत होतो. झाली नाही. एक सीन म्हणजे सकाळी एक मुलगा उठतो आणि तयार होतो. टमरेल मध्ये त्याची बहीण पाणी ओतते. या ज्या गोष्टी आहेत ना त्या आतमधून आहेत.

स्त्रिया नेतृत्व घेतात 'माझं घर' मधला संघर्ष जो आहे त्यातली नायिका स्त्री जाणिवेची नाही. तिच्या अनुभवांतून तिला कळत जातं. त्याच्यामध्ये जी सासू आहे तिच्यामागे उभी राहणारी हा त्यातला मुख्य भाग आहे. संध्याशी (पत्नीशी) चर्चा करून लिहिलं. बाईची घुसमट मला समजली त्यामुळे. ती अपर मिडल क्लासची आहे. नवत्याच्या समान पातळीवर. त्याच्यामध्ये जी सासू आहे. ती सासू मागच्या पिढीची. 'अधांतर'च्या आईशी समकालीन सासू. तिला त्यात हिच्या मागे उभं राहिलं पाहिजे, त्या अनुभवाच्या गोष्टी. मी माझ्या सूनेच्या मागे उभी राहिली कारण हे तुझ्या मामाचं पत्र आलंय. की गावची जमीन आहे त्यावर एन.ओ.सी. दे. हे जे आहे हा एक अनुभव. तुझा बाप तू लहान असतांना घर सोडून दुसरं लग्न करायला गेला. जे माझ्या बापाचं आहे ते माझं होत नाही. आणि माझ्या नवऱ्याचं माझ्या मुलाचं होईल तर मग माझं काय. हा प्रश्न मला जो पडला तो सूनेला पडू नये. कायदेशीर व्हायला हवं. कायदा बायकांच्या बाजूने नाही. तू ते करून

मग निघून जा. या तिघी ज्या आहेत त्यांच्या अनुभवांना झेपणात्या गोष्टी आहेत. 'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' मध्ये हे सांगितलं आहे. फेमिनिस्ट विचार जो आधी टोकाचा वाटायचा तो आता शक्य आहे. यातील सुप्त जाणीव 'माझं घर' मध्ये अनुभवांतून निर्माण झालेली आहे.

**प्रश्नः** त्या काळातील विविध चळवळींचा विशेषतः आंबेडकरवादी दलित चळवळींचा काही प्रभाव?

**जयंतः** गिरणी कामगार वस्तीमध्ये दलित प्रभाव नव्हता. दलित जाणीव वाङ्मयातून जाणवली. जाणिवेचा भाग नाही मग तो साहित्यात येणार नाही. त्यामुळे नाटकांमध्ये आंबेडकरवाद, दलित आंदोलने, दलित पात्रे नाहीत. 'काय डेंजर वारा सुटलाय' मध्ये बबन येलमाले दुष्काळी भागातून आला आहे. जीणं नकोसं करून तो इथे आलाय. त्याच्यात सुप्त जात जाणीव. सूत्रधाराला तो म्हणतो की मला मागचं कापायचंय. जगण्याच्या धडपडीतून जाणीव येते. 'माझं घर' यासारख्या नाटकात वी हक्काचा प्रश्न कायद्याने येतो, आंबेडकरांनी हिंदू कोड बीलच्या अंगाने आंदोलन केली होती तो प्रभाव माझ्यावर होता. माझे मित्र होते. त्याच्यात भुजंग (मेश्राम), (विवेक) राजापुरे होते. याच्यात आम्ही भेटून अगदी सहजपणे यायच्या. म्हणजे गज्वींनी 'घोटभर पाणी' लिहिलेलं. चंद्रमणी तुर्भेकर होता ग्रुपमध्ये. गज्य आणि संजय (पवार) यांच्यामध्ये जाणिवा जगण्यातून आल्या आहेत.

**प्रश्नः** अनुभवातून तुमची नाटक उभी राहतात, जाणीवपूर्वकता तुमच्या नाटकात जाणवत

नाही...

**जयंत:** आपलं जगणं मध्यमवर्गीय आहे, आपण वाचन करतो, त्यातून ते घडतं, माझ्या नाटकातल्या स्त्रिया मला भेटलेल्या असल्यामुळे अधिक सजीव वाटतात. या बायका स्वतः सफर करतात. त्या राग काढतात बायकांवरच. बायका बायकांचं युद्ध. विचार माझ्या मनात आल्यावर मी लिहित नाही. माणसं दिसावी लागतात. प्रश्न जोडून असतात. प्रत्येकाचे खरे असतात. प्रोटेगनिस्ट दिसायला लागतो तेव्हा ॲन्टेंगनिस्ट दिसायला लागतो. तो मला समजला की मी लिहितो.

सोपी उत्तर द्यायची नाहीत, वास्तव यायला हवं, चिकित्सक दृष्टी हवी, शेवट आला म्हणजे झालं असं नाही मी गिरणी संपानंतर नोकरी सोडली. १९८६ पासून 'महानगर' मध्ये. लग्नानंतर मी स्त्री प्रश्नाकडे सजगतेने पाहायला लागलो. आणीबाणीत कामगार पेटलेला होता. मी पण झपाटल्यासारखा मिटींग अटेंड करायचो. साम्यवाद, समाजवाद यापेक्षा मला ॲन्टीएस्टॅबलिशमेंट ही जाणीव झाली. एस्टॅबलिशमेंट ही शोषण करते. 'अशांती पर्व' ही एकांकिका. द्रौपदी आणि सामान्य बाई असा संवाद. महाभारतातील युद्ध घडल्यानंतर अनेक बायका होत्या त्या सगळीकडे फिरत होत्या. युद्धामध्ये बायका उचलल्या जायच्या. वेश्या युद्धावर पाठवल्या जायच्या. अशी उचललेली बाई जिला मुलगा झाला. तिचा मुलगा रडतोय सतत. त्याला मारून टाकायचं आहे. तिला जीव द्यायचा आहे. तिथे व्यास भेटतो. तो तिला म्हणतो हे द्रोपदीमुळे झालंय. तिला हे मूल दे. ती येते द्रोपदीकडे असा प्रसंग आहे. ॲन्टीवॉर असं आहे. त्या दोघींच्या संवादामधून असं लक्षात येतं की युद्ध द्रोपदीमुळे झालं नाही. 'चक्र' या एकांकिकेला उत्तर म्हणून ही एकांकिका मी लिहिली.

'चक्र'मध्ये अश्वत्थामा आणि द्रोपदी एकत्र येतात. युद्ध द्रोपदीमुळे झालं नाही. अश्वत्थामाने तिची मूलं मारण्यात याची परिणती झाली. बाईला कारण बनवलं जातं. सत्तेची लालसा है युद्धाचं कारण. हे तिला

समजतं तेव्हा धर्मराज बसलाय त्याच्या दरबारात जा. त्याच्याकडे जातांना तिला दिसतं की शेकडो वायका आहेत. पण तो उत्तर देत नाही. बाईला टारगेट केलं गेलंय. या सर्व भागात स्त्री जाणीवेकडे पाहण्याचा प्रश्न आहे. ‘विठाबाईचा कावळा ‘मध्ये विठाबाई मेलेली आहे आणि कावळा घरात घुसलाय. तो कावळा चुकून घुसलाय. पण लोकांना वाटतं की विठाबाईच आली आहे. स्पेसला माझ्या आयुष्यात महत्त्व आहे. आपली राहती जागा असणं हे कठीण आहे. बायकांमध्ये असे काही वाद पराकोटीने मांडले गेले. ‘काय डेंजर वारा सुटलाय’ मध्ये स्थलांतर आणि विस्थापन प्रश्न आहे. एक स्त्री असणं आणि जमीन हे इंटर्नल नातं. बायका ज्या पद्धतीने मी पाहिल्या आहेत त्यांच्यामध्ये त्या जागेची जाणीव जिवंत असते. बाई टिकते कारण ती जमीन तिची आहे हे तिला भक्कमपणे माहिती असते. त्यामुळे बाई जगते. टिकते.

**प्रश्नः** जागतिकीकरणाचा प्रभाव तुम्ही पाहता याबद्दल मांडणी कराल का?

**जयंतः** २००० नंतर जेव्हा जागतिकीकरणोत्तर भाग सुरू झाला. त्याच्यात मिडीया आलं, असंख्य प्रलोभनांमध्ये माणसांचं जगणं अडकलं. मूळ प्रश्नामधून लक्ष काढून घेऊन नको त्यात अडकवणं. व्हर्चुअल चित्र उभारायचं. सलग चित्र दिसता कामा नये. उत्तर आधुनिक अवस्थेत समोरच्या अनुभवाचे तुकडे झाले आहेत. तुम्ही ते बघू शकत नाहीत. तुम्ही तुकड्यांमध्ये विखुरले गेले आहात. विभागात काम करणं माहीत असतं. हा जो तुकडा आहे तो उत्तर आधुनिक अवस्थेत मला कळतंय की हा तुकडा आहे. माझेही तुकडे झाले. तुकड्यांमध्ये अनेक गोष्टी आहेत. लिंक एकच आहे. म्हणून विस्कळीतपणा मांडणीत दिसतो. मांडणीत तो विस्कळीतणा मी डेलिबरेटली घेत होतो.

नाटकात माणूस वस्तू पातळीवर, भावनांपासून शरीरापर्यंत सगळं वस्तूरूपात येतो, हे जाणीवपूर्वक नाही. विचारांचे वाहक म्हणून मी नाटक लिहित नाही. नाटक मी लिहितो त्यात ते विचार येतात.

अस्तित्वाचा प्रश्न आपल्याला गिळून टाकेल असं मला वाटतं. सगळ्या व्यापातापामध्ये स्थलांतर विस्थापन जगभर चालंय. माणूस जागेच्या शोधात आहे. त्यात मूळं हरवत आहेत. त्या माणसाला प्रश्न पडतो की ही जागा आधी आदिवासींची असेल. ही मी लिगली घेतली पण कोणीतरी विस्थापित केलंय. जागतिकीकरणाचा नियमच झाला आहे. विकासाचा अर्थ खूपदा असा होतो की तुम्ही विकासाला ठेचतात. विकासाच्या व्याख्या कोण करतं यावर सुद्धा ते आधारित आहे. मी ऍंटीविकासवादी आहे हा विकास मला मान्य नाही. पहाटेच्या वेळी घरात घुसून ते घर बळकावणं 'काय डेंजर वारा'मध्ये सांगितलेलं खरं आहे.

जागतिकरीकरणामध्ये गमावणं राहिलं नाहीच आणि शरीर पण राहिलं नाही. जागतिकीकरणानंतरच्या गोष्टी खूप वेगळ्या झाल्या. प्रत्येक क्लासला जगण्यात एक स्पेस होती. मी निराशावादी आहे. लोकं खूप टिका करतात. काही वर येतात काही खाली घसरत जातात. बघता बघता ते नष्ट होतात. यामुळे लिहितांना मला निरर्थक वाटत आहे. जागतिकीकरणामुळे याचा वेग वाढला आहे. जागतिकीकरणांत समजतं नाही आपण आत कधी जातोय. 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन'मध्ये तो लेखक असं म्हणतो की मी कृतिशील लेखक आहे. लेखकपणाला टाचणी लागली आहे. लेखक म्हणून माझी निष्पाप वृत्ती म्हणून मी नगण्य आहे. साहित्य वाचून पण जाणिवपूर्वक तशी पात्र मी ठरवून केली नाहीत. ते झालं. पेच पडलेले अनेकांना दिसतात. 'अधांतर' मध्ये माझा कॅथार्सिस आहे. लाईक्स आणि डिसलाईक्स याच्यासाठी भांडणं हा मूर्खपणा होता. पण तो होता.

**प्रश्न:** राजकीय चळवळींचा प्रभाव...? या दृष्टीने नाटकाच्या प्रोसेसकडे कसे पाहता?

**जयंत:** नाटकात राजकीय विधानं येतात, पण राजकारणी येत नाहीत. राजकीय चळवळीत मी नव्हतो. कामगार राजकारणापासून अलिप्त राहत नाही. राजकीय जाणिवा आहेत. आपण शोषले जातो ही जाणीव तुमच्या जगण्यातून येतेच. चळवळी संदर्भात असलेले लोकं खूप होते. सांस्कृतिक चळवळ गिरणगावात होती. जिच्याशी मी निगडीत होतोच. गिरणी संपाच्या काळातलं वातावरणात हे कुठलाही नवीन विचार आला की तो पटकन गिरणगावात पसरायचा.

‘अधांतर’मध्ये राजकीय विधानं दिसतात. मुळामध्ये मला राजकीय माणूस दाखवायचा नाही. कॉम्प्लेक्सिटी बघण्यात मला रस होता. माझे वडील काँग्रेसचे. खूपच सभ्य, अधांतरमध्ये आजची ही जी व्यवस्था आहे ती तुमचा बळी घेते. तुम्हांला मारायला गिरणी कामगाराला मारायला त्यांचीच मुलं वापरली गेली. ‘माझं घर’ मधलं राजकारण हे अजून वेगळं आहे. जागतिकीकरणाआधी माणूस ‘आपला राजकारणाशी संबंध नाही’, असं म्हणू शकत होता. पण ते चित्र नंतर बदलून गेलं. ‘आता जागतिकीकरण तुमच्या घरात, तुमच्या अंगावर येत होतं आणि यातून आपल्याला काही सुटता येत नाही, आपण राजकीय धोरणाचे थेट शिकार होत आहोत’, हे मध्यमवर्गाला जागितकीकरणानंतरच समजलं. त्यामुळे त्या काळी लिहिणारे आम्ही सर्वच या जागतिकीकरणाचा नीट विचार करू लागलो. शफाअत खानचं ‘राहिले दूर घर माझे’, ‘शोभायात्रा’ ही त्याचीच उदाहरणे आहेत.

२००० नंतर परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली. नाटकांत राजकीय माणसं प्रत्यक्ष दिसत नाहीत; पण राजकारणाचे अप्रत्यक्ष सूचन दिसते. व्हिलन असा दिसत नाही, तर तो जाणवतो. कनिष्ठ वर्गीय, मध्यमवर्गीय

हतबलता, त्यांचं निरुपद्रवी असणं यात दिसतं. टेंगशे हा ब्राह्मण आणि मध्यमवर्गीय माणूस. अगदी संस्कारी घरातला. शुद्ध आणि धार्मिक संस्कारी असणारा माणूस शांत जाणवतो. पण त्याची रोजच्या जीवनातील हतबलता ही राजकीय हतबलता आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यातून आलेला हा मध्यमवर्ग सतत संघर्ष करून जगताना दिसतो. गोधा प्रकरणात हिंदूंनी इतका पाठिंबा का दिला?

याचा विचार करतानाचा माझ्या नेणीवेचा भाग म्हणजे ‘टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन’, ‘चंदूच्या लग्नाची गोष्ट’मध्ये वेश्यांची आक्का लग्न झालेल्या मुलीला सांगते, की ‘तू लग्न करून चूक केलीस. हे मंगळसूत्र वगैरे काय? आम्ही मोकळ्या आहोत. हवं त्या माणसाला घेऊ शकतो. तू लग्न करून अडकलीस. नकाराचं स्वातंत्र्य घालवलंस.’ लग्न होणं आणि त्यातून बाहेर येणं असं त्यांच्या मनात नाही. या दोन्ही कथांतून दिसतं की विषय जाणीव वेगळी आणि मध्यमवर्गीय जाणीव वेगळी.

**प्रश्न**: ‘अधांतर’ ते ‘टेंगशेच्या स्वप्नाची गोष्ट’ या २० वर्षांच्या प्रवासात घडलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांचा प्रभाव दिसतो. या समकालिनत्वाकडे कसं बघता?

**जयंत**: पत्रकार असल्यामुळे कंटेम्परररी जगत राहणं, सतत सभोवतालला रिॲक्ट होत राहणं हा माझ्या कामाचा भाग आहे. वास्तव आणि सत्य यात मी फरक करतो. वास्तवावरून येणारं सत्य मी लगेच स्वीकारत नाही. कारण त्यामागे आणखा कित्येक गोष्टी असतात. ज्या तितक्याच किंवा त्याहून जास्त खऱ्या असतात. त्या बऱ्याचदा आपल्या समोर येत नाहीत. एखाद्या तात्कालिक गोष्टीचा तात्कालिक परिणाम असेल तर ती जाते निघून. पण खोल मनावर परिणाम करणारी असेल ती गोष्ट मी आणखी अभ्यास करून लिहितो. जसं की, एखादा शोषित माणूस सुद्धा शोषक असू शकतो, हे थांबून बघावं लागतं. ते वरवर पाहता कळत नाही.

सामाजिक जाणीव दाखवता येत नाही. ती अशीच अभ्यासाने, संयमाने दिसते. एखादी समस्या जशी महत्त्वाची, तशी व्यक्ती देखिल महत्त्वाची असते. समस्येच्या विरुद्ध मार्गाने व्यक्ती फिरत असते. त्यामुळे संघर्ष होत असतात व लेखक म्हणून ते तपासावे लागतात.

**प्रश्नः** कुठल्या नाटककारांचा किंवा नाटकांचा प्रभाव आहे असे वाटते?

**जयंतः** भाऊ पाध्येंच्या लेखनातून प्रेरणा मिळाली. तेंडुलकरांचा प्रभाव तेंडुलकर मला प्रामाणिक वाटतात. तुम्ही जेव्हा लिहिता, तेव्हा कोणाचेही नसता. पात्रच लेखकाकडून घडवून घेतात. तुम्हांला स्वतःला नाकारता यायला पाहिजे. पत्रकार असताना बलात्काराच्या बातम्यांसाठी गेलेलो असताना लक्षात आलं, की काही वस्तींमध्ये लहान मुलांच्या लैंगिकतेबद्दलच्या संकल्पनाच वेगळ्या आहेत आणि त्या त्यांच्या शेजारा-पाजात्यांच्या वागण्यातून, आई-बाबांच्या वागण्यातून तयार झालेल्या आहेत. आपल्याला जो बलात्कार वाटतो, ती त्यांच्या दृष्टीने मुलीकडून मान्यता मिळालेली गोष्ट असते. कोपर्डी बलात्कार प्रकरणात दलित मुलाला मारलं. मी नाटक लिहायचं ठरवले. मी हा विचार करतो, की मुलीचं काय झालं असावं? ती मराठा आहे. तिचं घराबाहेर पडणं बंद झालं. तिला मामाच्या घरी पाठवलं. तिथल्या मुलींना कळल्यावर तिकडे तिला राहणं अशक्य झालं. मामाने पुन्हा तिच्या घरी आणून सोडलं. मुलाच्या इथे मदत गेली लोकांची. मूळ घटना अत्यंत भयानक तर असतेच, शिवाय त्यानंतर होणारे परिणाम खूप विचित्र असतात. हे गुंते जर कळले नाही तर लिहिता येत नाही. महानगरचे आठवड्याचे पेपर घेऊन तेंडुलकरांचे मार्गदर्शन घ्यायला जायचो. आधी “तुम्हांला एखादी गोष्ट रिपोर्टींग करायची असेल तर ते समजून घ्या. समजलं नाही तर त्या माणसाला जाऊन भेटा. समजून घ्या. ही पत्रकारिता. मला जे दिसतं ते खरं आहे असं नाही.” हे माझ्या लेखनात आलं.

**सौजन्यः** http://hdl.handle.net/10603/342106,savitribai phule pune University.

# संदर्भ सूची

## आधार ग्रंथ सूची


**1.** पवार, जयंत. '*अधांतर*'. रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.३५ सी, पं. मालवीय मार्ग ताडदेव, मुंबई.१९९९.

**2.** पवार, जयंत**. '**माझं घर'.

3. पवार, जयंत. 'काय डेंजर वारा सुटलाय'. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती-१९९९.


## ग्रंथ सूची


1. भगत, दत्ता. *मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास ( आरंभापासून १९९० पर्यंत)*. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २०१९.
2. संपादक जोग, रा. श्री. *मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड चौथा (१८०० ते १८७४*). महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे, १९७३.
3. बनहट्टी, श्रीनिवास नारायण. *नाट्य व रंगभूमि*.१९५५.
4. गंधारे, द. के. *मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल*. शब्दालय प्रकाशन.
5. मांडे, प्रभाकर. *लोकरंगभूमी (परंपरा, स्वरुप आणि भवितव्य)* सौ. मधुमिता राजीव बर्वे मॅनेजिंग डायरेक्टर, मधुरज पब्लिकेशन प्र. लि.,२५१ क, शनिवार पेठ, पुणे,२००७.
6. मराठे, कृ. बा. *मराठी रंगभूमीचा पूर्वरंग*.
7. केतकर, गोदावरी. *भरतमुनीचे नाट्यशास्त्र*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दि, १९६२.
8. गिंडे, वा. पु. *शेक्सपिअर आणि मराठी 'नाटक'तौलनिक साहित्याभ्यास*. शब्दालय प्रकाशन.
9. ब्रह्मे, मों. द, *'नटसम्राट एक अभ्यास'*.

10. शिरसाठ, शिवदास. *दालित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाट्यविश्व*. कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, २००९.

11. कानेटकर, वसंत. *'नाटक 'एक चिंतन'*. नीळकंठ प्रकाशन, पुणे, १९७४.

12. फडके, ना. सी. *नाटक*. प्रतिभासाधन देशमुख आणि कंपनी, पुणे, सा. १९६०.

13. देशपांडे, ग. त्र्य. *'भारतीयसाहित्यशास्त्र*. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ति, १९८०.

14. संपादक तर्कतार्थ, लक्ष्मणशास्त्री जोशी. *मरठी विश्वकोश खंड ८ वा*.

15. देशपांडे, वि. भा. *नाट्यव्यक्तिरेखाटन पौराणिक – ऐतिहासिक*. गंधारे द. के – मराठी वाड्मय प्रकार: स्वरूप, संकल्पना व वाटचाल, शब्दालय प्रकाशन.

16. कऱ्हाडे, सदा. *'शोकनाट्याचे साहित्यरुप'*. पी. पी. एच बुक स्टॉल, मुंबई -४, १९७१.

17. संपादक. नाईकवाडे,राजेंद्र. जयस्वाल, राजन. *'समकालीन मराठी रंगभूमि'*, सचिन उपाध्याय विजय प्रकाशन हनुमान गल्ली, सीतबर्डी नागपूर,४४००१२,२०१०

18. पाटील,भारती . *'स्त्रिया समाज आणि राजकारण'*, प्रकाशक सुशील लक्ष्मण धसकटे.

19. पेडणेकर, सुहास. *महानगरीय साहित्य*. एम ए मराठी, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ.

20. कुलकर्णी, आरती. मोतेवार, रेखा. *'नाट्यावलोकन'*. सचिन जगदीश उपाध्याय विजय प्रकाशन हनुमान गल्ली, सीताबर्डी नागपूर. प्र.आ २०१८.

21. पावडे, व्यंकटी. *'रा. रं.बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा'*. दत्ता डांगे, 'कांचनब्रह्म', इसाप प्रकाशन,१९० सहयोगनगर, नांदेड, प्रथामावृती १५ ऑगस्ट २०१३.

22. लागू, श्रीराम. *'आजची मराठी प्रायोगिक रंगभूमी'*. नवभारत, रंगभूमी विशेषांक मे-जून १९८५.

23. देशपांडे, वि. भा. *मराठीतील प्रायोगिक रंगभूमी* एक धावता आलेख.

## वेबसाइट

1. https://marathi.latestly.com/maharashtra/veteran-author-journalist-jayant-pawar-passes-away-at-the-age-of-61-282128.html/amp

2. https://en-m-wikipedia-org.translate.goog/wiki/Drama?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=tc
3. https://youtu.be/pPYHV_wHKT8?si=CpxAaBy-Ytd5OynG
4. https://news4mind.wordpress.com/2014/11/30/adhantar-review/.